दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com

वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा, गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १६ | अंक :१४६ | सोमवार १२ डिसेंबर २०२२ | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

## मस्ती अंगाशी आली; पार्श्वभागात कॉम्प्रेसरचा पाईप टाकून हवा भरली, तरुणाचं आतडं फाटलं

**साहसिक वृत्त/ ११ डिसेंबर**

**धुळे :** धुळ्यामध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. तपासणी दरम्यान तरुणाच्या पार्श्वभागात कॉम्प्रेसरचा पाईप टाकून हवा भरली गेली. यात तरुणाचं आतडं फाटलं आहे. गंभीर जखमी झाल्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे. जाणून बुजून हे कृत्य केल्याचा आरोप मृत तरुणाच्या नातेवाईकांनी केला आहे. धुळे जिल्ह्यातील सुजलॉन कंपनीमध्येही धक्कादायक घटना घडली आहे. तुषार असे मृत तरुणाचे नाव आहे.याप्रकरणी संतप्त नातेवाईकांनी निजामपूर पोलीस स्टेशनला घेराव घातला आहे. कंपनीतील दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी अशी माणी करण्यात आली आहे. तसेच मयत तुषार निकुंभ याच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीचे लेखी आश्वासन कंपनीने द्यावे अशी मागणीदेखील कुटुंबियांनी केली आहे.

## अंतराळात सापडली सोन्याची खाण

**साहसिक वृत्त/ ११ डिसेंबर**

**धुळे :** अंतराळात मोठा स्फोट झाल्याची घटना घडलीय. गॅमा किरणांमुळे हा स्फोट झाल्याची माहिती आहे. खगोलीय घटना ब्लॅक होलसह ताऱ्यांच्या टक्करमुळे घडल्याचा शास्त्रज्ञाचा दावा आहे. लीसेस्टर विद्यापीठातील भौतिकशास्त्रज्ञांसह शास्त्रज्ञांच्या पथकाने या स्फोटाला दुर्मिळ वैश्विक घटना म्हटले आहे.

शक्तिशाली स्फोटाचे नाव काय?

गॅमा किरणांचे स्फोट हे विश्वातील सर्वात शक्तिशाली स्फोट असल्याचे बोलले जाते. हा स्फोट डिसेंबर २०२१ मध्ये जवळच्या आकाशगंगेतून आढळून आला होता. शास्त्रज्ञांनी या स्फोटाला GRB 211211A असे नाव दिले आहे. ही अपेक्षेपेक्षा जास्त इन्फ्रारेड प्रकाश उत्सर्जित करते. त्याच्या संशोधनानुसार प्रकाश किलोनोव्हापासून आला आहे.किलोनोव्हा ही एक तारकीय खगोलीय घटना आहे.

### सुविचार

आपलं जे असतं ते आपलं असतं
आणि आपलं जे नसतं ते आपलं नसतं.

### चारोळी

सांग या हृदयाचं
आता मी काय करू
ठेवू स्वतःकडे की,
तुला देऊन जावू

### हसा जरा जपून..

सासुबाई: नवर्या मुलाला विचारतात..
वर्हाडी एवढे आनंदात वेडयासारखे का नाचू राहिलेत?.
नवरदेव- कारण त्यांना सांगितल आहे कि..
हुंड्याच्या पैस्यातून सगळ्यांची उधारी दिली जाईल..

## ४०० फूट खोल बोअरवेलमध्ये अडकलेल्या मुलाचा मृत्यू

**साहसिक वृत्त/ १० डिसेंबर**

**बैतूल:** मध्य प्रदेशातील बैतूलमध्ये बोअरवेलमध्ये अडकलेल्या ६ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. ८४ तासांनंतर मुलाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. पहाटे ३ वाजता बचाव पथक मुलाच्या जवळ पोहोचले होते. पहाटे ५ वाजेपर्यंत मृतदेह बाहेर काढता आला. सात वाजता मृतदेह बैतूल येथील जिल्हा रुग्णालयात आणण्यात आला.

# खोटे शपथपत्र देवून हायकोर्टाची फसवणूक करणारे मुंबई पालिका आयुक्त इकबाल चहल यांच्याविरुद्ध अटक वारंट काढण्यासाठी उच्च न्यायालयात अवमानना याचिका दाखल



ॲड. निलेश ओझा

* कोरोना काळात लसीच्या निर्बंधा मागे कोणताही सहभाग नसल्याचे खोटे शपथपत्र दाखल केल्याचे पुरावे सादर.
* चहल यांनी सर्वोच्च व उच्च न्यायालयाने कोरोना लसींचे निर्बंध बेकायदेशीर ठरवल्यानंतर सुद्धा ते निर्बंध आजही लागू असल्याचे खोटे शपथपत्र दिल्याचे उघड.
* स्वतःविरोधातील खाजगी फौजदारी प्रकरणात सरकारी खर्चातून पालिकेच्या वकिलांची सेवा घेवून सरकारी पैशाचा दुरुपयोग केल्यामुळे भादवि ४०९, १२०(B), ३४ आदी कलमांअंतर्गत कारवाईची मागणी.
* याचिकेत चहल याच्याविरुद्ध भादवि१९१,१९२,१९३,१९९, २००, २०१, २१८, ४०९, ४७१, ४७४, १२०(B), ३४ अंतर्गत कारवाईची मागणी.
* याआधीही खोटे शपथपत्र दाखल केल्याप्रकरणी पोलीस आयुक्त एम. एस.अहलावत व त्यांचे सहकारी पोलिस अधिकारी यांना सर्वोच्च न्यायालयानें भादवी १९१,१९२,१९३ अंतर्गत १ वर्ष व कोर्ट अवमानना अंतर्गत ६ महिने तुरुंगात पाठविले होते.

**साहसिक वृत्त/ ११ डिसेंबर**

**मुंबई:** कोरोना काळात लस कंपन्यानां हजारो कोटींचा गैरफायदा करून देण्यासाठी लसीचे जीवघेणे परीणाम लपवून व लस पूर्णतः सुरक्षित आहे असा खोटा प्रचार करून लस न घेणाऱ्या नागरिकांना लोकल ट्रेन,माल,ऑफिस आदी ठिकाणी प्रवेश नाकारून नागरिकांविरुद्ध बेकायदेशीर व असंवैधानिक निर्बंध आणून त्यांना जीवघेणी लस घेण्यास जबरदस्तीने भाग पाडून त्यांच्या मृत्यूस व अनेक गंभीर शारीरीक दुष्परीणामास आणी नागरिकांच्या मूलभूत संविधानिक हक्कांच्या उल्लंघनास कारणीभूत ठरलेले राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव सीताराम कुंटे, पालीका आयुक्त इकबाल चहल व माजी अति.आयुक्त सुरेश काकाणी यांच्याविरुद्ध मुंबई मेट्रोपोलिटन न्यायालयात 'अव्हेकन इंडिया मुव्हमेंट' चे अंबर कोइरी यांनी ॲड. निलेश ओझा व ॲड. ईश्वरलाल अग्रवाल यांच्यामार्फत फौजदारी केस दाखल केली होती. त्या केसची दाखल घेऊन मुंबई न्यायालयाने तिन्ही आरोपींना भादवी १६६,१६७, ३०४-A, ४२०, १२०(B) अंतर्गत आरोपी बनवून समन्स जारी केले होते.

त्या आदेशाला फक्त आरोपी क्र.२ इकबाल चहल यांनी मुंबई महापालिकेच्या वकिलांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. डें.P. (Cri)३९२३/२०२२.

त्या याचिकेतील शपथपत्रात इकबाल चहल यांनी असे खोटे नमूद केले की तक्रारीत नमूद बेकायदेशीर निर्बंध हे आरोपी क्र.१ सीताराम कुंटे यांनी पारीत केले होते व चहल यांनी फक्त त्या आदेशाचे पालन केले आहे. तसेच ते आदेश कोणीच बेकायदेशीर ठरविले नसल्यामुळे वरिष्ठाच्या आदेशाचे पालन करने आरोपी चहल यांना बंधनकारक होते.

चहल यांनी ते खोटे शपथपत्र दाखल करून न्यायालयाची दिशाभूल करून उच्च न्यायालयाकडून त्यांच्याविरोधातील तक्रारीवर देवून तात्पुरती स्थगीती मिळविली.

चहल यांचे वरील शपथपत्र हे पूर्णतः खोटे असल्याचे सिद्ध करणारे सर्वोच्च व मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश, शासनाचे आदेश, पुरावे आणी श्री मिन्हाझ मर्चन्ट यांच्याद्वारा लिखित आणि स्वतः इकबाल चहल यांच्याकडून प्रसारीत पुस्तक 'इकबाल सिंग चहल, कोविड वॉरिअर' या पुस्तकावरून चहल यांचा खोटेपणा उघडकीस आला आहे.

महाराष्ट्रात लस न घेतलेल्या लोकांवर निर्बंध घालण्याचा सल्ला इकबाल चहल यांनीच दिला होता व तसे निर्बंध लावून त्यांनीच अनेक लोकांना लस घेण्यास भाग पाडले असा खुलासा त्यांच्या स्वतःच्याच मुलाखतीत केला होता. तसेच सर्वोच्च व मुंबई उच्च न्यायालयाने ते निर्बंध बेकायदेशीर व असंवैधानिक असल्याचे घोषित केले होते.

वरील सर्व पुरावे दाखल करुन तक्रारकर्त्याने इकबाल चहल यांच्याविरुद्ध खोटे शपथपत्र दाखल केल्याप्रकरणी भादवि १९१, १९२, १९३, १९९, २००, २०१, २१८, ४७१, ४७४, १२०(B), ३४ आणि कोर्ट अवमानना कायद्याअंतर्गत कारवाईची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे.

तसेच स्वतःच्या वैयक्तिक केससाठी पालिकेच्या विधी अधिकाऱ्यांची सेवा वापरून शासकीय निधीचा दुरुपयोग केल्याप्रकणी भादवि ४०९,१२०(B) आणि ३४ अंतर्गत कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने सुधीर व्होरा वि. कमिश्नर ऑफ पोलीस २००४ क्रि. लॉ. जनरल २२७८, प्रकरणात स्पष्ट कायदा ठरवून दिला आहे की आरोपी अधिकाऱ्यातर्फे सरकारी वकिलांनी बाजू मांडू नये.

उच्च न्यायालयाने रामेश्वर लक्ष्मीनारायण कहाळे वि. गजानन समाधान पाचपोर २००५ ऑल एम आर (क्रि) २३९२, प्रकरणात अश्याच कारणासाठी सरकारी वकिलावर ५००० रुपये दंड ठोठावला होता.

न्यायालयात खोटे शपथपत्र दाखल केल्याप्रकरणी या आधी अनेक अधिकाऱ्यांना तुरुंगात पाठविण्यात आले असून सर्वोच्च न्यायालयाने पोलीस आयुक्त एम. एस. अहलावत व इतर पोलीस अधिकाऱ्यांना एक वर्ष ६ महिना तुरुंगात पाठविले होते. [Afzal vs. State of Haryana AIR १९९६ एण २३२६.

नूकतेच मुंबई उच्च न्यायालयानेही मंगेश चव्हाण वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र २०२० SCC OnLine Bom ६७२ प्रकरणात अश्या आरोपी अधिकाऱ्यांना समाजात मोकळे सोडणे हे चुकीचे असून त्यांच्याविरुद्ध करवाई झालीच पाहिजे असे आदेश दिले आहेत.

---

## बसवराज बोम्मईंनी पुन्हा डिवचले:एक इंचही जमीन देणार नाही, महाराष्ट्राचे शिष्टमंडळ अमित शहांना भेटल्याने फरक पडत नाही



**वृत्तसंस्था / ११ डिसेबंर**

**नवी दिल्ली :** सीमावादावरून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी पुन्हा महाराष्ट्राला डिवचले आहे. बोम्मई यांनी ट्विट केले आहे की, आपले भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्याशी बोलणे झाले आहे. महाराष्ट्राला एक इंचही जमीन देणार नाही. कोणतीही तडजोड करणार नाही. महाराष्ट्रातील कन्नडिगांच्या संरक्षणासाठी खबरदारी कर्नाटक सरकारकडून घेतली जात आहे.

**महाराष्ट्राचे यापूर्वीही प्रयत्न**

विशेष म्हणजे काल महाराष्ट्रातील खासदारांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन कर्नाटकाकडून होत असलेल्या अन्यायाबाबत तक्रारी मांडल्या. त्यानंतर बसवराज बोम्मई यांनी ट्विट करून या भेटीमुळे काहीही फरक पडणार नाही, अशी वल्गना केली आहे. बसवराज बोम्मई यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेतल्याने काही फरक पडणार नाही. यापूर्वीही महाराष्ट्राने असे प्रयत्न केले आहेत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. सर्वोच्च न्यायालयात आमचा न्यायप्रविष्ट खटला मजबूत आहे. आमचे सरकार सीमाप्रश्नावर तडजोड करणार नाही.

**लवकरच अमित शहांना भेटणार**

तसेच, आपले उद्याप केंद्रीय गृहमंत्री अमित शहांशी बोलणे झाले नाही. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डांशी बोलणे झाले आहे. सोमवारी कर्नाटकचे खासदार अमित शहा यांना भेटणार आहे. राज्याची कायदेशीर बाजू मांडण्यासाठी मी देखील लवकरच अमित शहांना भेटणार आहे, असे बसवराज बोम्मई यांनी सांगितले.

## शाईफेक करणाऱ्याविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल



**वृत्तसंस्था / ११ डिसेबंर**

**नवी दिल्ली :** भाजपा नेते आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक करणाऱ्यावर जीवे मारण्याचा प्रयत्न करणे आणि सरकारी कामात अडथळा निर्माण करणे असे गुन्हे दाखल झाले आहेत. यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

'शाईफेकीचे समर्थन करणे चुकीचे आहे, पण शाई फेकणाऱ्या युवकावर जे गुन्हे दाखल झाले आहेत ते पाहता सरकार तालिबानींसारखे वागू लागले आहे असे वाटते,' अशी प्रतिक्रिया राजू शेट्टींनी दिली.

राजू शेट्टी म्हणाले, 'शाईफेकीचे समर्थन करणे चुकीचे आहे, पण शाई फेकणाऱ्या युवकावर जे गुन्हे दाखल झाले आहेत ते पाहता सरकार तालिबानींसारखे वागू लागले आहे असे वाटते. ३०७ म्हणजे धारदार शस्त्राने जीवे मारण्याचा प्रयत्न आणि ३५३ म्हणजे सरकारी कामात अडथळा याचा अर्थ महापुरुषांचा अपमान करणे हे सरकारी काम आहे का?'

'मग हा कायदा दिल्लीतील शेतकरी आंदोलनात ज्या सरकारने ७०० हून अधिक शेतकऱ्यांचा बळी घेतला त्याला जबाबदार असणाऱ्यांवर ३०२ सह ही कलमे का लावण्यात आले नाहीत?' असा प्रश्न राजू शेट्टींनी विचारला.

'शस्त्रास्त्र कायद्यानुसार गुन्हा दाखल करणे अतिरेकीपणा'

मानवाधिकार कार्यकर्ते आणि वकील असिम सरोदे यांनीही या प्रकरणी ट्वीट करत मत व्यक्त केलं. ते म्हणाले, 'शाईफेक प्रकरणात कलम ३०७ म्हणजे जीवे मारण्याचा प्रयत्न करणे आणि १२० ब, शस्त्रास्त्र कायद्याचा वापर करणे यानुसार गुन्हा दाखल करणे अतिरेकीपणा आहे.' 'यंत्रणांच्या मदतीने कायद्याच्या गैरवापराचे हे उदाहरण आहे. त्यामुळे आमची कायदेशीर टीम आरोपींची केस मोफत चालवेल. परंतु, शाईफेकीचा व बेताल वक्तव्य करणाऱ्यांचा निषेध,' असंही असीम सरोदे यांनी नमूद केलं.

## वडिलांसमोरच १०० जणांनी मुलीला पळवून नेले:घरात घुसून वडिलांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण



**वृत्तसंस्था / ११ डिसेबंर**

**रंगारेड्डी :** तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यातील आदिबाटला भागात शुक्रवारी एका २४ वर्षीय महिला डॉक्टरचे अपहरण करण्यात आले. डझनभर लोकांनी त्यांच्या घरात घुसून तोडफोड केली. त्यानंतर वडिलांना मारहाण करून त्यांनी मुलीला जबरदस्तीने पळवून नेले. मात्र, पोलिसांनी काही तासांतच आरोपीला पकडून महिलेला सुरक्षित घरी पोहोचवले.

या घटनेचा व्हिडिओही व्हायरल होत आहे. लाठ्या घेऊन अनेक लोक घरात घुसताना क्लिपमध्ये दिसत आहेत. काही लोक घराबाहेर उभ्या असलेल्या कारची तोडफोड करत आहेत. यानंतर एका व्यक्तीला घराबाहेर ओढून लाठ्या-काठ्याने मारहाण केली जाते. एएनआय न्यूज एजन्सीनुसार, मुलीच्या पालकांनी आरोप केला आहे की सुमारे १०० लोक घरात घुसले आणि मुलीला जबरदस्तीने घेऊन गेले. वैशाली असे या तरुणीचे नाव असून ती डेंटिस्ट आहे. महिलेच्या कुटुंबीयांनी दावा केला आहे की तिला तिच्या बेडरूममधून ओढून बाहेर आणले आणि कारमधून घेऊन गेले. नवीन रेड्डी नावाच्या व्यक्तीवर जमावाचे नेतृत्व केल्याचा आणि मुलीचे अपहरण केल्याचा आरोप कुटुंबाने केला आहे. जो मुलीला त्याच्याशी लग्न करण्यासाठी त्रास देत होता.

**वडील म्हणाले- नवीन सोशल मीडियावर मुलीचा छळ करायचा**

बॅडमिंटन खेळताना दोघांची भेट झाली आणि नंतर त्यांची मैत्री झाली, असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. यानंतर नवीनने लग्नाचा प्रस्ताव आणला, मात्र मुलीने काही कारणांमुळे नकार दिला. यानंतर नवीनने याबाबत लोकांशी बोलण्यास सुरुवात केली आणि प्रस्ताव नाकारल्याबद्दल प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.त्यानंतर त्याने इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर तिचा छळ केला आणि तिने पाठलाग केल्याचा आरोप करत पोलिसात तक्रार दाखल केली.त्यांनी सांगितले की नवीनचे या परिसरात काही चहाचे स्टॉल आहेत. दुकानातील कामगारांसह तो घरात आला आणि तोडफोड केली.

**नवीनसह १८ जणांना अटक**

पोलिसांनी मुख्य आरोपी नवीनसह १८ जणांना अटक केली आहे. पीडितेचे अपहरण केल्यानंतर आरोपींनी तिलाही मारहाण केली आणि धामाणकाले .राचाकोंडा आयुक्तालयाचे अतिरिक्त आयुक्त सुधीर बाबू म्हणाले की, हा निश्चितच गंभीर गुन्हा आहे.



पान ८ वरुन

**विरूळ येथील समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावर ई-लोकार्पण संपन्न**

दादाराव केचे यांनी समृद्धी महामार्गाला 'सर्वांगीण विकासाचा महामार्ग' असे सांगत आर्वी विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, उद्योजक तसेच तरूण तरूणींना कृषी संलग्न व्यवसायातून रोजगार निर्मिती होणार आहे. वेळेची बचत झाल्याने विकासाची गतीही वाढेल. तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी समृद्धी महामार्गसाठी घेतल्या आहेत तेही रग्गड मोबदला मिळाला आहे तेही समृद्ध झाले आहे. तसेच हा महामार्ग ग्रिनफिड महामार्ग असल्याने वन्यप्राण्यांची काळजी घेतली आहेत. तसेच लाखो वृक्ष लागवडीने निसर्ग टिकला आहे. कृषी निगडित अनेक व्यवसाया सोबत विदर्भ, मराठवाडा हे देशाची आर्थिक राजधानी मुंबई सोबत जोडल्याने आर्थिक उन्नतीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

या प्रसंगी आमदार रामदासजी आंबटकर, राजेश बकाने प्रदेश सचिव भारतीय जनता पक्ष, जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष वरून पाठक, विजय बाजपेयी आर्वी विधानसभा प्रमुख भाजपा, प्रशांत वानखेडे अध्यक्ष भाजप आर्वी तालुका, जगन गाठे अध्यक्ष भाजपा आर्वी शहर, राजाभाऊ गिरीधर, नंदू वैद्य, विनय डोळे, संजय अंभोरे, सुभाष चकोले, मिथुन बारबैले, जितेंद्र ठाकरे अध्यक्ष भाजयुमो आर्वी तालुका, दिनेश हरेल, गजानन वाघ, राजाभाऊ वानखेडे, संजय राऊत, अशोक निकम, राजेश हिवसे, राजेश सावरकर सरपंच रसुलाबाद, बाळाभाऊ सोनटक्के सरपंच नेरी मिर्झापुर, शंकर राठी, प्रज्वल कांडलकर, दुर्गेश पुरोहित, मथुरेश पुरोहित, संजय थोरात, मिलिंद हिवाळे, उर्मिलाताई पवार, रंजना कदम, उषा सोनटक्के, शुभांगी भिवगडे, लोकेश गलौले, नरेश गेडाम, राजु मानकर, प्रकाश सातरोटे, स्वप्नील कठाळे, योगेश ताजनेकर, निखिल कडू, निलेश देशमुख, बंटी चांदुरकर, अमित शिंगाणे, रवि गाडगे, प्रविण पवार यांच्यासह आर्वी तालुक्यातील व विरूळ सर्कल परीसरातील अनेक महीला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.

**हिंगणघाट येथील पोलिस डि.बी.पथकाने केला चोरीचा गुन्हा उघडे**

सदर गुन्हयात जबरीने चोरलेला एक मोबाईल व इतर दोन चोरलेले मोबाईल असा एकूण जुमला किमंत १,९३,००० / रू. चा माल जप्त करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. श्री. नूरूल हसन, पोलीस अधीक्षक, डॉ. सागर कवडे अपर पोलीस अधीक्षक, वर्धा, दिनेश कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट, पो.नि. श्री. कैलाश पुंडकर, पोलीस स्टेशन, हिंगणघाट यांचे मार्गदर्शनात पोउपनि सोमनाथ टापरे, डि. बी. पथकाचे पो.हवा. शेखर डोंगरे, नापोशि निलेश तेलरांधे, सचिन घेवंदे, विशाल बंगाले, सचिन भारशंकर व पो.शि. संतोष गिते व सायबर पोस्टे चे नापोशि दिनेश बोथकर यांनी केली आहे.

# समृध्दी महामार्गाच्या कोनशिलेचे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते अनावरण



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**नागपूर :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या कोनशिलेचे अनावरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. महामार्गाच्या नागपूर येथील झिरो पॉंईट पासून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या टोल प्लाझा येथे अनावरणाचा हा कार्यक्रम झाला.

राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते.

कोनशिलेचे अनावरण केल्यानंतर प्रधानमंत्र्यांनी महामार्गाची पाहणी केली. तत्पूर्वी श्री. मोदी यांनी समृद्धी

## महामार्गावर १० किलोमीटरचा प्रवास

महामार्गावर झिरो पॉंईट ते टोल प्लाझा असा १० किलोमीटरचा प्रवास केला. त्यांच्या समवेत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व अन्य मान्यवर होते.

**प्रधानमंत्र्यांनी घेतला ढोलताशाचा आनंद**

कोनशिला अनावरणप्रसंगी प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी ढोलताशा पथक ठेवण्यात आले होते. प्रधानमंत्र्यांनी स्वतः ढोल वाद्य वाजवत अनोखा आनंद घेतला. तसेच या पथकातील कलावंतांशी संवाद साधला. कार्यक्रमस्थळी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अनावरण संपवून निघतांना प्रधानमंत्र्यांनी नागरिकांची गर्दी असलेल्या ठिकाणी वाहन हळू करत नागरिकांना हात दाखवित त्यांचे अभिवादन स्विकारले.

# मानव अधिकार सेवा जिल्हा महासचिवपदी पंकज बावणे यांची निवड




**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**सिंदी (रेल्वे) :** केंद्रीय मानव अधिकार सेवा संघटन नई दिल्ली शाखा भंडारा तर्फे दिनांक १० डिसेंबर २०२२ रोज शनिवारला सकाळी ११ वाजता जागतिक मानव अधिकार दिन व कार्ड वितरण कार्यक्रम घेण्यात आला.

प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. सुजाताताई वॉल्देकर नागपूर हायकोर्ट तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अनवर अली सय्यद नागपूर हायकोर्ट, शशिकांत भोयर महाराष्ट्र लाईव्ह न्यूज चॅनेल, अनिरुध्द भोयर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, मनोज चवरे विदर्भ प्रदेश अध्यक्ष, सौरभ रामटेके संघटन मंत्री, विदर्भ प्रदेश, मिलिंद रामटेके अध्यक्ष भंडारा जिल्हा, संध्या रामटेके कार्याध्यक्ष भंडारा, अजय पर्बत वर्धा हे होते.

सर्वप्रथम पाहुण्याचे स्वागत करण्यात आले व त्यानंतर मान्यवरांकडून यथोचित मार्गदर्शन करण्यात आले. प्रसंगी कार्ड वितरण करण्यात आले. यावेळी वर्धा जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून वर्धा जिल्हा उपाध्यक्ष पदी अजयभाऊ पर्बत, जिल्हा सचिव पदी रुपेश सौंदरकर, महासचिव पदी पंकज बावणे व हिंगणघाट तालुका अध्यक्ष पदी राजु नेसेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमातील सर्व वर्धा पदाधिकाऱ्यांना शुभेच्या देण्यात आल्या व समाधान तिरपुडे, यांनी संचालन केले आणि अनिरुध्द भोयर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष यांनी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# वारंवार होत असलेल्या छत्रपती शिवरायांच्या अवमानाच्या निषेधार्थ पुसद येथे रास्ता रोको आंदोलन




**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**पुसद :** पुसद येथील शिवप्रेमी यांनी निषेधार्थ आज रोजी राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोशारी यांनी आपल्या भाषणात वारंवार छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान केला.त्या निषेधार्थ दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात अश्वरूढ पुतळ्याच्या चहूबाजूने सर्वपक्षीय रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सदरचे आंदोलन हे राज्यपालांच्या निषेधार्थ जिल्ह्यातील पहिलेच आंदोलन होय.

यावेळी विदर्भाचे आकर्षण असलेल्या छत्रपती शिवरायांच्या अश्वरूढ पुतळ्यास भव्यदिव्य गुलाबपुष्प माला परिधान करण्यात आली. अर्धाकृती पुतळ्याचे देखील पूजन सर्व शिवप्रेमींच्या हस्ते पार पडले. मोठ्या उत्स्फूर्तपणे शिवप्रेमीं आंदोलनात सहभागी झाले होते. आम्ही संपूर्ण महाराष्ट्र ज्यांच्या नावाखाली सन्मानाने जगतो त्याच छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास काही लोक जनतेसमोर मांडत असतात,अवमान करीत असतात हे आम्ही यापुढे अजिबात सहन करणार नसल्याचे प्रतिपादन आ.ॲड.इंद्रनील नाईक यांनी यावेळी आंदोलन कर्त्यांसमोर केले. तर पुसद अर्बन बँकेचे अध्यक्ष शरद मैंद यांनी देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचा अवमान जाणीवपूर्वक वारंवार केल्या जात आहे हे अत्यंत खोडसाळपणाचे आहे. दि.७ डिसेंबर रोजी उभारलेला रास्ता रोको हा प्राथमिक स्वरूपाचा होता. मात्र महाराजांचा अवमान करण्याचीही मालिका न थांबविल्यास व्यापक स्वरूपाचे उग्र आंदोलन उभारणार आसल्याचा गर्भित इशारा प्रशासनास दिल्याचे यावेळी आंदोलनकर्त्यांना संबोधताना शरद मैंद यांनी सांगितले.

यावेळी शहराच्या प्रवेशित दर्शनी छत्रपती शिवाजी महाराज चौकामधील वाशिम, यवतमाळ, नांदेड व शहरात प्रवेशित होणाऱ्या मुख्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनात शहरातील विविध राजकिय पक्ष,सामाजिक संघटनांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला होता. 'जय भवानी..! जय शिवराय..!!, राज्यपाल कोशारीचा निषेध असो...निषेध असो..!! छत्रपतींचा वारंवार अवमान करणाऱ्यांचा निषेध असो.' आदी घोषणांनी आसमंत दुमदुमला होता. एसडीपीओ आदित्य मिरखेरकरानी आंदोलनाची व्याप्ती लक्षात घेताच शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याहेतूने शहर व वसंतनगर पोलीस स्टेशनमधील शेकडो पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांचा फौजफाटा छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळपासूनच तैनात करून ठेवला होता. आंदोलनापश्चात एसडिपीओ आदित्य मिरखेलकर,शहर पो स्टे चे पोनी दिनेशचंद्र शुक्ला यांनी प्रातिनिधिक स्वरूपात ५०० आंदोलन कर्त्यांना शहर पोलीस स्टेशनमध्ये स्थानबद्ध करून सुटका करण्यात आली. यावेळी राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोशारी यांचे निषेधार्थ लेखी स्वरूपातील कार्येवाहीच्या मागणीचे निवेदन परिक्षावधीन उपविभागीय अधिकारी कार्तिकेयन एस.व एसडीपीओ मिरखेलकर यांना देण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी तथा परीक्षावधीन तहसीलदार एकनाथ काळबांडे, पोलीस अधिकारी सपोनि दीपक ढोमने, प्रेमकुमार केदार,उल्हास परांडे, लोहकरे, सोनाबाई कदम हे अधिकारी उपस्थित होते.

तसेच स्थानबद्ध करण्यात आलेल्या आंदोलांकर्त्यांमध्ये आ. ॲड. इंद्रनील नाईक, पुसद अर्बन बँकेचे अध्यक्ष शरद मैंद, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष क्रांती पाटील कामारकर, अनिरुद्ध पाटील चोंढीकर, विजय जाधव, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष दिगंबर जगताप सर,संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष सुधीर देशमुख,हिंद सेनेचे ॲड.अनिल ठाकूर, राजू साळुंखे, कृष्णा जाधव, गवळी समाज संघटनेचे वैभव फुके, स्वप्नील जयस्वाल, भीम टायगर सेनेचे किशोर कांबळे, हभप घोगरे महाराज, बिरसा मुंडा ब्रिगेडचे मारोती भस्मे,राजू दुधे,शेख कयूम,मोहमद खान सन्नी, अशोक बाबर, नितीन पवार, प्रभाकर टेटर, निखिल चिद्दरवार, ताहेरखान पठाण, उत्तम चापके, श्रीरामपूर सरपंच आशिष काळबांडे, आदिवासी युवा परिषेदेचे जिल्हाध्यक्ष सुनील ढाले, प्रवेश पांगारकर, गणेश पावडे, संदीप चौधरी, किशोर पानपट्टे, शफिक हिराणी, अभय गडम, अजय पुरोहित, विकास जामकर, पुंडलिक शिंदे, गणेश पावडे, हर्षी सरपंच गजानन टारफे, अमोप व्हडगिरे, तालुका महिला कॉंग्रेसच्या अध्यक्षा प्रा. संध्या कदम, सौ.शुभांगी पानपट्टे, सौ.पल्लवी देशमुख इत्यादींसह विविध संघटनेचे पदाधिकारी कार्येकर्ते रास्ता रोको आंदोलणात प्रामुख्याने सहभागी होते.

# सरपंच उपसरपंच ग्रा.पं. सदस्य यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण शिबीर

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**अल्लीपूर :** अल्लीपुर येथे परीसरातील ग्रा.प. येणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, यांचे यशदा अंतर्गत शासना माफैत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

ग्रा. प. अधीनीयम बाबद सवीस्तर माहीती दीली त्याच प्रमाने ग्रा. प. ची स्थापना व तीचे उदीष्ट सांगीतले पचायतराज बाबद सुध्दा सवीसत्तर माहीती सांगीतली. कामकाज कसे करायचे लोकप्रतीनीधीचे कर्त्यव्य व उद्दीष्ट बाबद ही सवीस्तर मार्गदर्शन केले. या वेळेस प्रशीक्ष म्हणून यशदा ट्रेनिंग सेंटरच्या एस. भोरे मॅडम, सवीता झाडे मॅडम, अशोक सूर्यवंशी यांनी मार्गदन केले. या वेळेस महीला ग्रा. प. सदस्या पुरूष ग्रा.प. सदस्या सरपंच उपसरपंच उपस्थीत होते.

# घाटंजी येथील नगर परिषदेत दिव्यांग व अधिवक्तादिन साजरा



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**घाटंजी :** आद्यस्वातंत्र्यवीर श्रीमंत यशवंतराव होळकर यांची जयंती तसेच जागतिक दिव्यांग दिवस आणि अधिवक्ता दिवस नगर परिषद घाटंजी च्या कार्यालयत साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने यशवंतराव होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जागतिक दिव्यांगादिन व अधिवक्तादिन साजरा करण्यात आला.

त्यावेळी मुख्याधिकारी अमोल माळकर आणि दिव्यांग व्यक्तीच्या हक्कासाठी सतत लढा देणारे सदस्य अंकुश ठाकरे, आधार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष युनूस मेमन, तालुकाध्यक्ष पुरुषोत्तम ठाकरे, तसेच परिवर्तन विकलांग बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष उपस्थित होते. प्रशांत कलांद्रे, आणि दिव्यांग ना लाभ मिळवून देण्यासाठी नेहमीच अग्र असणारे नितीन पवार व कार्यालयातील अन्य कर्मचारी लेखाधिकारी नितीन हातमोड, आशिष गिरी, कस्तुरे उपस्थित होते.

# विदर्भवीर, स्वातंत्र्यसेनानी बाबासाहेब मुखरे यांच्या स्मृतिदिनी अभिवादन

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**पुसद :** पुसद येथील विदर्भविर,थोर स्वातंत्र्यसेनानी, माजी आमदार बाबासाहेब मुखरे यांच्या बेचाळीसाव्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले आहे.स्व. बाबासाहेब मुखरे स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आदरांजली कार्यक्रमात विविध मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. येथील बाबासाहेब मुखरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले.

यावेळी मोहिनि इंद्रनील नाईक, माजी प्राचार्य डॉ.उत्तम रुद्रवार, कृषिभूषण दीपक आसेगावकर, माजी कुलगुरू डॉ.शेषराव सूर्यवंशी, राजन मुखरे, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेश कोटलवार आदींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीराम पवार, दिलीप पारध, दिलीप राठोड, माजी मुख्याध्यापक अ. ज. उपाध्ये, भारत पाटील,उद्धव साखरे, प्रा. सुरेश गोफने, प्रा. नारायण क्षीरसागर, विजय उबाळे, रेनुदेव डूब्बेवार, हरिभाऊ खरात, बबन पांढरे, अशोक उंटवाल, नानाभाऊ फुके,सुरेश पाटील (भंडारी), रमेश डंबोळे, सचिन ओमनवार, सचिन लाभसेटवार, धनंजय चक्करवार, संजय चांडक, नीळकंठ पाटील, नागेश डूब्बेवार, ॲड.उमेश चिद्दरवार, रमेश पळसकर, अभय गडम, विनोद जील्हेवार, नंदकुमार शिरमवार, बंडोपंत पोलकट, वामनराव देशमुख,श्याम यडतकर, अनिल जोशी, किशोर ठाकरे, संजय कोरटकर,दिनेश सिंघल, गणेश कुकडे, रमेश मुखरे, हेमंत मुखरे, विजय राठोड, सतीश पाटील, यांचेसह को. दौ. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुरेश धनवे, उपमुख्याध्यापक गजानन वायकुळे,पर्यवेक्षक रीता बघेल, प्रमोद रायपूरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रा संतोष मुखरे यांनी प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.स्व. बाबासाहेब मुखरे स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.आनंद मुखरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.शहरातील नागरिक,को दौ. विद्यालयाचे विद्यार्थी तथा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रब्बी हंगामासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजना

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**वर्धा :** राज्य शासनाने रब्बी हंगाम २०२२-२३ करिता प्रधानमंत्री पिक विमा योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी विमा हप्ता भरून दिनांक १५ डिसेंबरपर्यंत या योजनेत सहभागी होऊ शकतात. सदर योजना ही कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक स्वरूपाची आहे. खरीप व रब्बी हंगाम २०२२ करिता जिल्ह्यासाठी आयसीआयसीआय लोंम्बार्ड जनरल इन्शुरन्स या विमा कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे. अन्नधान्य व गळीतधान्य पिके यासाठी विमा संरक्षित रकमेच्या १.५ टक्के व नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रक्कमेच्या ५ टक्के रक्कम ही शेतकऱ्यांनी भरावयाची विमा हप्ता रक्कम आहे. उर्वरित विमा हप्ता रक्कम ही शासन स्तरावरून भरण्यात येणार आहे. पिकविम्याचे अर्ज भरण्यासाठी बँकांमध्ये होणारी शेतकऱ्यांची गर्दी टाळण्याकरीता विम्याचे शेतकऱ्यांचे अर्ज, विमा हप्ता कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) मार्फत ऑनलाइन पद्धतीने मोफत स्वीकारण्यात येत आहे. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर या अंतिम दिनांकापूर्वी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. सहभागासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, पिक विमा कंपनीचे कार्यालय तसेच नजीकच्या बॅंकेशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषि विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

**विमा संरक्षित व हप्ता रक्कम**

गहू बा. या पिकासाठी विमा संरक्षित रक्कम प्रती हेक्टर ३८ हजार इतकी असून शेतकरी विमा हप्ता ५७० रुपये प्रति हेक्टर इतका आहे. केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा हेक्टरी प्रत्येकी १ हजार ९९५ इतका आहे. हरभरा पिकासाठी विमा संरक्षित रक्कम प्रती हेक्टर ३५ हजार इतकी असून शेतकरी विमा हप्ता ५२५ रुपये प्रति हेक्टर इतका आहे. केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा हेक्टरी प्रत्येकी १ हजार ८३७ इतका आहे.

**हंगामासाठी जोखमीच्या बाबी**

रब्बी हंगामाकरिता जोखमीच्या बाबींमध्ये हवामानातील प्रतिकुल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान, पिक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पुर, क्षेत्र जलमय होणे, भुस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, कीड व रोग ईत्यादी बाबीमुळे उत्पन्नात येणारी घट, स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान, नैसर्गिक करणामुळे पिकांचे होणारे काढणीपश्चात नुकसानीचा समावेश आहे.

# कलाकारांनी एकरकमी मानधन अर्थसहाय्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**वर्धा :** कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर प्रयोगात्मक कलेवर अवलंबुन असलेल्या कलाकारांना अर्थसहाय करण्याचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने निर्णय घेण्यात आला होता. या योजनेला मुदतवाढ देण्यात आली असून योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या कलाकारांनी संबंधित तहसिल कार्यालय येथे अर्ज सादर करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्य एकरकमी एकदाच पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. याबाबत संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुबंई यांच्या स्तरावरुन वृत्तपत्रातून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित तहसिल कार्यालय येथे अर्ज सादर करण्यास कळविण्यात आले आहे. एकल कलाकाराकरीता पात्रता, निकष व अटी पुढील प्रमाणे आहे.

एकल कलावंत महाराष्ट्र राज्यातील प्रयोगात्मक कलेतील केवळ कलेवर गुजराण असलेले असावे, आर्थिकदृष्टया दुर्बल कलाकार, कलाकाराचे महाराष्ट्रात १५ वर्षापासुन वास्तव्य असावे, कलेच्या क्षेत्रात १५ वर्ष कार्यरत असावे, कलाकाराचे वार्षिक उत्पन्न ५० हजाराच्या आत असावे, केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या वृध्द कलाकार मानधन योजनेतुन मानधन घेणाऱ्या लाभार्थी कलाकारांना तसेच वैयक्तिक शासकीय अर्थसहाय योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

यापुर्वी या योजनेचा लाभ घेतलेल्या कलावंतांना या योजनेचा दुबार लाभ घेता येणार नाही. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालयात आवश्यक कागदपत्रासह दि.३० डिसेंबर पर्यंत अर्ज सादर करावा. योजनेबाबत अधिक माहिती व अर्जाचा नमुना तहसिल कार्यालय, पंचायत समिती, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद येथे उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in, ke http://www.mahasanskruti.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे.

## संपादकीय

# वलयकोषातला आत्मानंदी..

आपल्याकडे खेळाडूंना निवृत्तीची वेळ आणि जागाही ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले जाते. व्यक्तिपूजा आणि वलयासक्ती मुरलेल्या समाजात यापेक्षा वेगळे काही अपेक्षित नाही..!

फर्नांडो सांतोस यांना लवकरात लवकर भारतात बोलावून त्यांचा जाहीर सत्कार करण्याची नितांत गरज आहे. ते खुलेपणाने व उत्तम अभिव्यक्त होणाऱ्यांतले नाहीत, नाही तर त्यांचे छानसे भाषणही आयोजित करता आले असते. पण.. कोण हे फर्नांडो सांतोस? तर ते आहेत पोर्तुगालच्या फुटबॉल संघाचे विद्यमान प्रशिक्षक. पोर्तुगालचा संघ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत शनिवारी रात्री उपांत्यपूर्व फेरीचा सामना खेळेल. परंतु केवळ त्या संघाच्या येथवरच्या वाटचालीबद्दल सांतोस सत्कारयोग्य ठरू शकत नाहीत. मग त्यांचे कर्तृत्व काय? तर, पोर्तुगालचा सर्वोत्तम फुटबॉलपटू, जगभरातील कोटयवधी फुटबॉलरसिकांचा लाडका ख्रिस्तियानो रोनाल्डो याला विश्वचषक स्पर्धेत दुसऱ्या फेरीच्या सामन्यात वगळण्याची धमक सांतोस यांनी दाखवली. इतकेच नव्हे, तर त्याच्या अनुपस्थितीत उतरवलेल्या पोर्तुगीज संघाने प्रतिस्पर्ध्यावर (स्वित्झर्लंड) अर्धा डझन गोल डागून दिमाखात उपांत्यपूर्व फेरीही गाठून दाखवली. रोनाल्डोला वगळण्याची जोखीम कदाचित अंगाशी आली असती. किंवा पोर्तुगाल त्या सामन्यात पिछाडीवर पडता, तर नाइलाजाने रोनाल्डोला मैदानात उतरवून चुकीची कशीबशी उतराई करण्याची वेळ सांतोस यांच्यावर आली असती. दिएगो मॅराडोना जसा अर्जेटिनात, तसा रोनाल्डो पोर्तुगालमध्ये फुटबॉल दैवत. मॅराडोनाला असा मान मिळाल्यामुळे ती जागा लिओनेल मेसीला लाभत नाही. पण पोर्तुगालमध्ये कोणी मॅराडोना नव्हता. तेव्हा सांतोस यांच्या कृतीमागील धाडस समजून घेण्यासाठी प्रथम ख्रिस्तियानो रोनाल्डो ही काय वल्ली आहे, ते समजून घेणे क्रमप्राप्त ठरते. २००४ मध्ये पोर्तुगालला युरो स्पर्धा झाली. त्या स्पर्धेत विशीही न ओलांडलेल्या रोनाल्डोने पोर्तुगालकडून पदार्पण केले. नवीन सहस्रकाच्या सुरुवातीला पोर्तुगालकडून अनेक उत्तमोत्तम फुटबॉलपटू खेळत होते. यातील बहुतेक (उदा. लुइस फिगो) पोर्तुगालच्या युवा जगज्जेत्या संघाचे सदस्य होते. युवा संघाचे यश पुढे वरिष्ठ संघाकडूनही पाहायला मिळेल, अशी पोर्तुगीज फुटबॉलप्रेमींची अपेक्षा होती. ती पूर्ण झालीच नाही. २००४ मध्ये त्यांचा संघ युरो स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला. घरच्या मैदानावर अंतिम सामना आणि समोर ग्रीससारखा फुटबॉलमधील नवोदित संघ. काही तरी जिंकण्याची शक्यता आणि संधी त्या वेळी सर्वाधिक होती. पण तरीही पोर्तुगालचा संघ ग्रीसकडून पराभूत झाला. ख्रिस्तियानो रोनाल्डोचे आगमन पोर्तुगाल आणि विश्व फुटबॉल आसमंतात झाले, ते अशा निराशामय वातावरणात. तोपर्यंत तो इंग्लंडच्या मँचेस्टर युनायटेड क्लबकडून निष्णात फुटबॉलपटू म्हणून ओळखला जाऊ लागला होता. नवीन सहस्रकातील पहिल्या दशकाच्या उत्तरार्धात तो आणि लिओनेल मेसी यांनी क्लब फुटबॉलमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली. त्यामुळे फुटबॉलमधील विद्यमान महानतम खेळाडू कोण, या मुद्दयावर या दोघांमध्ये तुलना सुरू झाली. तुलनेचा हा खेळ आजतागायत सुरू आहे. यात उल्लेखनीय बाब म्हणजे, मेसी बहुतांश काळ बार्सिलोना या एका क्लबकडून खेळला आणि चमकला. याउलट रोनाल्डो मँचेस्टर युनायटेड, स्पेनचा रेआल माद्रिद, इटलीचा युव्हेंटस, पुन्हा मँचेस्टर युनायटेड अशा विविध क्लबांकडून खेळला. अशा बहुसांघिक कारकीर्दीमध्ये सातत्य राखणे अधिक आव्हानात्मक असते. रोनाल्डोची कारकीर्द झळाळती आहे हे नि:संशय. पाच वेळा 'बॅलन डी ओर' हा फुटबॉलमधील सर्वोच्च वैयक्तिक वार्षिक पुरस्कार त्याने पटकावला, त्याच्या जोडीला खंडीभर क्लब आणि चॅम्पियन्स लीग अजिंक्यपदे, पोर्तुगालसाठी एक युरो आणि एक युएफा नेशन्स लीग अजिंक्यपद. आता मेसी आणि रोनाल्डोला इतक्या झळाळत्या कारकीर्दीतही आपापल्या देशांसाठी विश्वचषक जिंकून देता आलेला नाही ही बाब सध्याच्या सेलेब्रिटी संस्कृतीत गौण ठरते हा भाग अलाहिदा.

पोर्तुगालसाठी रोनाल्डो मध्यंतरीच्या काळात अतिशय महत्त्वाचा होता. परंतु रोनाल्डोमुळेच पोर्तुगालने गेल्या १५-२० वर्षांत प्रगती केली, असे मानणे सत्यापलाप ठरेल. पोर्तुगालच्या समृद्ध फुटबॉल संस्कृतीचा आढावा घेण्यापूर्वी एक महत्त्वाची नोंद. २०१६ मध्ये युरो स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रोनाल्डोला २५ व्या मिनिटालाच दुखापतीमुळे मैदान सोडावे लागले. समोर होता फ्रान्सचा बलाढय संघ, त्यांच्या घरच्या मैदानावर खेळणारा. त्या वेळी पोर्तुगीज संघाचे प्रशिक्षक होते, फर्नांडो सांतोस! रोनाल्डोच्या अनुपस्थितीत निर्धारित वेळेत पोर्तुगालने फ्रान्सला गोलशून्य बरोबरीत रोखून धरले. अतिरिक्त वेळेत बदली खेळाडू म्हणून सांतोस यांनी पाठवलेल्या एडर या युवा खेळाडूने पोर्तुगालतर्फे सामन्यातला एकमेव, निर्णायक गोल झळकावला. रोनाल्डो साइडलाइनवरून त्याच्या संघाला अनेक सूचना करत होता. त्या वेळी सांतोस शांत होते. त्यांनी अखेरचा हुकमी एक्का म्हणून एडरला पाठवले आणि त्याने गोल झळकावला. रोनाल्डो त्याही सामन्यात अल्प काळ खेळला. पण त्याच्या अनुपस्थितीने सांतोस किंवा मैदानावर खेळणारे पोर्तुगालचे खेळाडू विचलित झाले नाहीत. याचे कारण रोनाल्डो म्हणजे पोर्तुगाल असे समीकरण झुगारून देण्याइतकी गुणवत्ता त्या संघात तेव्हा होती नि आजही आहे. रोनाल्डोच्या उदयाबरोबरच पोर्तुगालचा नवोदय होऊ लागला होता. हा संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करून दाखवू लागला होता. युरोपातील जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, इंग्लंड, नेदरलँड्स या देशांच्या फुटबॉल गुणवत्तेविषयी चर्चा होत असते. या देशांची महत्त्वाच्या स्पर्धेत कामगिरी उत्तम म्हणावी अशीच. तितक्या जोरकसपणे पोर्तुगालच्या कामगिरीचा उल्लेख होत नाही. परंतु नवीन सहस्रकात बेन्फिका, पोटरे, स्पोर्टिंग असे अनेक महत्त्वाचे क्लब तेथे उदयाला आले. युवा अकादमीच्या माध्यमांतून रोनाल्डोइतकीच गुणवत्ता असलेले असंख्य तरुण तेथे उदयाला आले. सर्वांनाच रोनाल्डोइतकी प्रसिद्धी वा यश मिळू शकले नाही. तरी एक संघ म्हणून पोर्तुगालच्या बांधणीत त्यांचे योगदान अमूल्य आहे. मुरब्बी सांतोस हे ओळखून आहेत नि त्या दिवशीही होते. रोनाल्डो पोर्तुगालसाठी खेळत नाही. तो क्लबसाठी किंवा प्रेक्षकांसाठीही खेळत नाही. रोनाल्डो हा रोनाल्डोसाठी खेळतो! त्याच्या ठायी अफाट कौशल्य, असीम ऊर्जा, तल्लख बुद्धी, अचाट तंदुरुस्ती वगैरे सारे काही आहे. पण त्याचा मैदानावरील वावर स्वयंभू असतो. कोणी कुठे खेळावे, कसे खेळावे ही चौकट त्याला मान्य नाही. त्याचा चौकटीबाहेरील असा स्वैर-स्वयंभू वावर सांतोस यांना मान्य नाही. तसाच तो अमान्य होता मँचेस्टर युनायटेडचे प्रशिक्षक एरिक तेन हाग यांना. त्यांनी रोनाल्डोला खेळवणेच बंद केले, तेव्हा रोनाल्डो वैतागून तेथून बाहेर पडला. रोनाल्डोसारखे खेळाडू खेळाचे सौंदर्य वाढवत असतील, त्यातून स्वत:ला अढळपद असल्याचे धरून चालत असतील. पण ते खेळापेक्षा मोठे नसतात. फुटबॉलसारख्या सांघिक खेळात तर नाहीच नाही. सांतोस रोनाल्डोच्या विरोधात नाहीत. त्याची गुणवत्ता त्यांना ठाऊक आहे आणि या स्पर्धेत अजूनही तो पोर्तुगालसाठी चमत्कार करू शकतो, ही जाणीवही त्यांना आहे. पण त्यांनी रोनाल्डोला त्याची 'जागा' दाखवून दिली. आणि आपल्याकडे? टी-२० विश्वचषक स्पर्धेत आपल्या वलयांकितांचा कालबाह्य खेळ आणि चातुर्याचा अभाव असंख्यांना खुपणारा ठरला. आमच्या मंडळाने त्यानंतरही या खेळाडूंना 'स्वत:च स्वत:चे भवितव्य ठरवण्या'चा अजब सल्ला दिला! आमच्याकडे खेळाडूंना जणू 'व्हीआरएस'चा पर्याय दिला जातो. निवृत्तीची वेळ आणि जागाही ठरवू देण्याचे स्वातंत्र्य दिले जाते.

# तरुणाईला जडतोय पक्षाघाताचा आजार



भारतातील तरुणांमध्ये सध्या पक्षाघात हा आजार वाढत आहे. लठ्ठपणा, मधुमेह, अतिरिक्त मद्यपान, धूम्रपान ही त्याची प्रमुख कारणे आहेत. याशिवाय ताणतणावाची जीवनशैलीही पक्षाघातासाठी कारणीभूत ठरू शकते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतात पक्षाघात होणाऱ्यांपैकी २० टक्के रुग्ण चाळिशीखालील वयाचे आहेत. हा आजार झालेल्या रुग्णांपैकी ३० टक्के रुग्णांचा मृत्यू होतो, तर ३० टक्के नागरिकांना अपंगत्व येते.

मानवी शरीरात एकाच वेळी एक किंवा अनेक स्नायू कार्य करत नसतील तर अशा स्थितीला पक्षाघात म्हणतात. यात शरीरातील स्नायू लुळे होतात. मेंदूला इजा झाल्यास पक्षाघात होतो. या स्थितीत संवेदी चेतांनाही धक्का पोहोचला तर बाधित भागातील संवेदनाही नाहीशा होतात. बदलत्या जीवनशैलीसह वाईट सवयींमुळे सध्या देशात तरुणांमध्ये पक्षाघाताचे प्रमाण वाढत आहे. मेंदूतील चेतापेशींना ऑक्सिजन आणि ग्लुकोजचा नियमित पुरवठा होणे आवश्यक असते. काही कारणाने रक्तपुरवठा थांबला तर चेतापेशींचे कार्य थांबते. अशा चेतापेशी ज्या अवयवाचे किंवा स्नायूंचे नियंत्रण करतात, त्या अवयवांच्या हालचालींवर परिणाम होतो आणि पक्षाघात होतो. काही वेळा अचानक रक्तदाब वाढल्यास मेंदूमधील रक्तधमनीत गळती होऊन अंतर्गत रक्तस्राव होतो. त्यामुळे चेतापेशींवरील दाब वाढून पक्षाघात होतो. मज्जरज्जू आणि मेंदू यांना जोडणाऱ्या भागामध्ये रक्तस्राव झाल्यास पक्षाघाताबरोबर मृत्यूही ओढवतो.

हा आजार सध्या भारतातील तरुणांमध्ये वाढत आहे. लठ्ठपणा, मधुमेह, अतिरिक्त मद्यपान, धूम्रपान हे त्याला प्रमुख कारण आहे. याशिवाय ताणतणावाची जीवनशैलीही पक्षाघातासाठी कारणीभूत ठरू शकते.

कामाच्या वेळा, आहार व आरामाकडे झालेले दुर्लक्ष, अपुरी झोप यामुळे तरुणांमध्ये पक्षाघातासारखे आजार वाढीस लागत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेनुसार भारतात पक्षाघात होणाऱ्यांपैकी सुमारे २० टक्के रुग्ण हे चाळिशीखालील वयाचे असतात. गावखेड्यात राहणाऱ्या लोकांच्या तुलनेत शहरातील लोकांमध्ये, महिलांमध्ये पक्षाघाताचा धोका अधिक आहे. या आजारामुळे ३० टक्के नागरिकांचा मृत्यू होतो. तर ३० टक्के नागरिकांना अपंगत्व येते.

**पहिल्या चार तासांत औषधोपचार फायद्याचा**

पक्षाघाताचा झटका आल्यावर पहिले तीन ते चार तास अत्यंत महत्त्वाचे असतात. या काळात मेंदूमधील गाठ विरघळण्यासाठी योग्य औषधोपचार केल्यास बहुतांश रुग्णांमधील मेंदूचे कार्य २४ तासांत सुरळीत होऊ शकते. मात्र त्यासाठी रुग्णाला पक्षाघाताचा झटका आला आहे किंवा मेंदूच्या कोणत्या भागात समस्या उद्भवली आहे ते पाहावे लागते.

रुग्णाचे सीटी स्कॅन आणि रक्त तपासण्या केल्यावर त्याच्यावरील उपायांची दिशा निश्चित केली जाते. या काळात उपचार करण्यात आले नाहीत तर मात्र पक्षाघातामुळे शरीराचा लुळा पडलेला भाग योग्य पद्धतीने काम करण्यासाठी चार ते सहा महिनेही लागतात व त्यानंतरही मेंदू पूर्ण क्षमतेने काम करण्याची शक्यता कमी असते.

**मेंदूला इजा झाल्यास पक्षाघाताची लक्षणे**

मेंदूचे शरीराच्या विविध भागांवर नियंत्रण असते. मेंदूमधील कोणत्या भागात इजा किंवा गाठ झाली त्यावर या व्यक्तीला पक्षाघातामुळे होणारी लक्षणे अवलंबून असतात. पक्षाघातामुळे या व्यक्तीची हालचाल, संवादातील समन्वय, शरीराअंतर्गत अवयवातील समन्वय आदींपैकी एक किंवा अनेक क्रियांवर परिणाम होऊ शकतो. काही वेळा हातपाय लुळे पडणे, बोलताना जीभ अडखळणे, तोल जाणे, चेहऱ्याला वाक येणे आदी अशी लक्षणे दिसू शकतात.

**पक्षाघात टाळण्यासाठी.**

उच्च रक्तदाब, धूम्रपान, मद्यपान, लठ्ठपणा, तंबाखूचे व्यसन, व्यायामाचा अभाव यामुळे पक्षाघात होऊ शकतो. हा होतो.

रक्तदाब, मधुमेह नियंत्रणात ठेवून या वाईट सवयी सुधारल्यास धोका टळू शकतो.

# टेस्टी टिफिन : कुसकुस सॅलड



**साहित्य :** कुसकुस, आवडीच्या भाज्या, पनीर, पाणी, ऑलिव्ह तेल, लसूण, लिंबू रस, मिरपूड, मीठ आणि साखर.

**कृती :** कुसकुसमध्ये कोमट पाणी घालून ते अर्धा तास ठेवा. चांगल्यापैकी फुलून येईल. पाणी कुसकुस बुडेल इतपतच ठेवा. फार घालू नका. चांगले भिजल्यानंतर ते काट्याने मोकळे करून ठेवा. त्यात ऑलिव्ह तेल घाला. आता सर्व भाज्या चिरून घ्या. पनीरचे तुकडे करून घ्या. ऑलिव्ह तेल, ठेचलेली लसूण, लिंबाचा रस, मिरपूड, मीठ आणि साखर एकत्र करून व्यवस्थित फेसून घ्या. हे सॅलडचे ड्रेसिंग तयार झाले. भिजवलेले कुसकुस, चिरलेल्या भाज्या आणि पनीर एकत्र करून त्यावर हे ड्रेसिंग ओता. छानपैकी मिसळून सॅलड खायला तयार आहे. तुम्ही या सॅलडवर अक्रोड, भाजलेली अळशी किंवा तीळही पेरू शकता. सजावटही होईल आणि सॅलडला एक कुरकुरीत चवही मिळेल. जर तुम्ही मांसाहारी असाल तर तुम्ही भाज्यांच्या ऐवजी वाफवलेले चिकन किंवा उकडलेली अंडीही वापरू शकता.

# इस्त्रोतल्या संधी साधण्यासाठी..



दोस्तांनो, भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्त्रोने अंतराळ मोहिमांमध्ये आघाडी घेतली आहे. नुकतंच 'चांद्रयान-२' चंद्राच्या दिशेने झेपावलं. यामुळे इस्त्रोचं खूप कौतुक झालं. तुम्हालाही अंतराळाबद्दल आकर्षण असेल, या क्षेत्रात करीअर घडविण्याचा विचार करत असाल तर इस्त्रो अनेक संधी उपलब्ध करून देते. या संधी साधता येतील. इस्त्रो ही संस्था विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या कार्यशाळांचं, प्रशिक्षण कार्यक्रमांचं आयोजन करते. इस्त्रोतल्या संधी साधण्यासाठी काय करता येईल यबाबतचं मार्गदर्शन..

दहावीनंतर विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन तुम्ही इस्त्रोतल्या संधी धुंडाळू शकता. गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय घेऊन बारावी उत्तीर्ण होणं गरजेचं आहे. यानंतर इस्त्रोच्या 'इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नालॉजी'मध्ये प्रवेश घेऊ शकता. इस्त्रो आयआयटी, एनआयटी तसंच इतर सरकारी तसंच खासगी संस्थांमधून पदवीधर आणि द्विपदवीधर विद्यार्थ्यांची निवड करते. एअरोस्पेस इंजिनिअरींग, मॅकेनिकल इंजिनिअरींग, रेडिओ इंजिनिअरींग किंवा इंजिनिअरींग फिजिक्सच्या क्षेत्रातल्या पदवीधर विद्यार्थ्यांची निवड होऊ शकते. यासोबतच इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स आणि डेव्हलपर्स तसंच सिव्हिल इंजिनिअर्सनाही इस्त्रोत संधी मिळू शकते.

सध्या इस्त्रोच्या मोहिमा मानवरहित असल्या तरी भविष्यात मानवाला अंतराळात पाठविण्याची तयारीही त्यांनी सुरू केली आहे. इस्त्रोच्या अंतराळवीरांना 'व्योमनॉट्स' या नावाने ओळखलं जाईल. यासाठीही विद्यार्थी प्रयत्न करू शकतात. इस्त्रोमध्ये ज्युनिअर रिसर्च फेलो कार्यक्रम राबवला जातो. ही संधी साधून तुम्ही संशोधन करू शकता. इंटर्नशीप्स, प्रोजेक्ट वर्क अशा संधीही इस्त्रो उपलब्ध करून देते.

विद्यार्थी इस्त्रोची प्रवेश परीक्षा देऊ शकतात. बीई किंवा बीटेक परीक्षा ६५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालले विद्यार्थी ही परीक्षा देऊ शकतात. लेखी परीक्षा आणि मुलाखतीनंतर उमेदवारांची निवड होते. यानंतर ज्युनिअर सायंटिस्ट किंवा ज्युनिअर इंजिनिअर म्हणून तुम्ही रूजू होऊ शकता.

# दुपारच्या जेवणानंतर सुस्तीची कारणे व उपाय



दुपारचे जेवण झाले, की आळस येणे, सुस्ती येणे, डुलकी घ्यावीशी वाटणे किंवा झोप येणे, असा अनुभव तुम्हीही अनेकदा घेतला असेल. खास करून सणावाराच्या दिवशी गोडधोड खाल्ल्यानंतर वा जड जेवण झाल्यानंतर तर असा अनुभव अधिकच येतो. हा तर सर्वांचाच अनुभव आहे. याचसाठी पूर्वी भोजनानंतर वामकुक्षी घ्यावी म्हणजे डाव्या कुशीवर झोपावे असे म्हणत असत.

काही लोकांना तर दुपारचं जेवण केल्यानंतर मस्तपैकी झोप काढण्याची सवय असते. त्यांना ती झोप मानवतेही, पण नोकरी करणाऱ्या, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या लोकांसाठी मात्र हे कदापि शक्य नसतं. अगदी सुट्टीच्या दिवशीही त्यांच्यामागे आठवडाभराची साठलेली घरची कामे करण्याचे टेन्शन असते.

दुपारचं जेवण केल्यावर झोप येऊ लागते आणि सोबतच आळसही येतो. दुपारच्या जेवणाआधीची आपली सक्रियता आणि दुपारच्या जेवणानंतरची आपली सक्रियता यातही फरक दिसतो, पण असं का होत असेल याचा कधी तुम्ही विचार केलाय का?

दुपारचे जेवण केल्यावर झोप येण्याचं कारण पचनतंत्राशी संबंधित आहे. जेवण केल्यानंतर जेव्हा आपल्या शरीरात पचनक्रिया सुरू होते तेव्हा पचन संस्थांना अन्न पचवण्यासाठी अतिरिक्त ऊर्जेची गरज असते. अन्न पचविण्यासाठी त्यांना अतिरिक्त एंजाइमचा स्राव करावा लागतो. ही गरज रक्तातून भागवली जाते. अशा स्थितीत रक्तप्रवाह पचनसंस्थांकडे अधिक वळवला जातो. परिणामी यावेळी मेंदूला होणारा रक्तप्रवाह कमी होतो. मेंदूमध्ये रक्तप्रवाह कमी झाल्याने मेंदू कमी क्रियाशील होतो. ज्यामुळे थकवा आणि आळस येतो. त्यामुळे झोपही येऊ लागते.

सकाळी जास्त क्रियाशील असतो मेंदू

जर झोपेचा संबंध हा पचन तंत्राशी आहे तर स्वाभाविकपणे असाही प्रश्न उभा राहतो की, नाश्ता केल्यावर झोप का येत नाही? खरं तर नाश्ता ज्यावेळी केला जातो. त्यावेळी आपला मेंदू फार क्रियाशील असतो. मेंदू एका मोठ्या झोपेनंतर आणि आरामानंतर सक्रिय झालेला असतो, पण दुपारच्या जेवणापर्यंत मेंदूची ऊर्जा आधीच्या तुलनेत अधिक खर्च झालेली असते. अशावेळी ऑक्सिजन कमी झाल्याने मेंदू काम करण्यासाठी लगेच तयार होऊ शकत नाही.

जर तुम्ही नोकरी करता, ऑफिसमध्ये काम करता आणि दुपारच्या जेवणानंतर तुम्हाला झोप येण्याची समस्या असेल तर ती दूर करण्यासाठी एक मार्ग आहे. दुपारच्या जेवणात कमीत कमी कॅलरी असाव्यात असा तुम्ही प्रयत्न करा, म्हणजे हलका आहार घ्या. जास्त कॅलरी असलेला आहार घेतल्याने जास्त झोप येते. डीप फ्राय आणि हेवी फूड पचवण्याला पचनसंस्थेला अधिक काम करावे लागते. त्यामुळे दुपारच्या जेवणात तळलेले पदार्थ आणि पचायला जड पदार्थ यांचा समावेश करणे टाळा.

# न्याहारीला पिताय मिल्कशेक तर सावधान



रोज सकाळची न्याहरी अगदी पोटभर करावी त्यामुळे दिवसभर मानसिक आणि शारीरिक मेहनतीसाठी ऊर्जा मिळते. म्हणून कित्येक लोक आपल्या न्याहरीमध्ये एखाद्या पेयाचा देखील समावेश करतात. पण काही पेय आपल्या शरीरास घातक ठरू शकतात. परंतू भरपूर प्रमाणात ऊर्जा देणारे काही पेय आपल्या शरीराची चरबी सुद्धा वाढवतात. जर तुम्हाला वजन नियंत्रीत ठेवायचे असेल तर काही ड्रिंक्सचे सेवन करने नक्की टाळा.

बनाना मिल्कशेक - केळ्यामध्ये कॅल्शिअम आणि पोटॅशिअम मोठ्या प्रमाणात असते. मात्र त्यात कॅलरीजही भरपूर प्रमाणात असतात. केळ्यामध्ये १०० किंवा त्यापेक्षा जास्त कॅलरीज असतात. त्यामुळे न्याहरीला बनाना मिल्कशेक घेणं टाळावं.

चॉकलेट मिल्क - दुधात चॉकलेट पावडर मिक्स करून पित असाल, तर तुमचं वजन अधिक वाढते. दुधापेक्षा चॉकलेटमध्ये जास्त कॅलरीज असतात. चॉकलेट मिल्कच्या एका ग्लासातून २०० ते २५० कॅलरीज मिळतात. त्यामुळे चॉकलेट मिल्क पिऊ नका.

दही - दात प्रोटिन जास्त आणि फॅट कमी असतं. मात्र अनेकदा सकाळी न्याहरीत अनेक जण दाचं सेवन करतात. मात्र नाश्त्यात मॉर्निंग ड्रिंक म्हणून घेतल्या जाणाऱ्या दात कॅलरीज, साखर आणि फॅट असते. त्यामुळे अशा दाचं सेवन टाळा.

## आजचे राशी भविष्य

**मेष :** आशावादी विचार हवा. सहकाऱ्यांच्या कलाकलाने घ्यावे. महत्त्वाची कामे होतील.

**वृषभ :** स्वप्नातून प्रत्यक्षाकडे याल. शब्द देताना जपून राहावे. आनंद वाढेल.

**मिथुन :** शिस्तबद्ध प्रयत्न हवेत. शासकीय प्रवक्त्यांनी जपून बोलावे. दिवस जिकिरीचा.

**कर्क :** संतुलन राखताना दमछाक होईल. विरोध मोडून काढाल. ताण टाळू शकाल.

**सिंह :** मुलांवर तसेच दागदागिने वा आभुषणांवर खर्च होईल. वेळ वाया घालवू नका.

**कन्या :** अनेक जबाबदाऱ्या पडतील. वेळापत्रक बदलेल. खर्चावर नियंत्रण हवेच.

**तूळ :** स्नेहमेळाव्यात आनंद. आर्थिक उदारता खर्च वाढवेल. शिस्तप्रियता हवी.

**वृश्चिक :** आकस्मिक लाभ होतील. सुशोभिकरणावर खर्च टाळा. सहकारी मदत करतील.

**धनु :** आधुनिक तंत्र वापरावे. समस्यांवर तोडगे मिळतील. प्रभावी भाषणाने लाभ.

**मकर :** तोडगे मिळतील. सहजीवनात प्रेम फुलेल. कलावंतांना यश मिळेल.

**कुंभ :** आंधळे प्रेम नको. व्यक्त होताना जिभेवर ताबा हवा. भूतकाळातील ताण संपतील.

**मीन :** सहजीवनात आनंद. निर्भेळ यश मिळेल. दुरावा संपेल.

## तीच माती..

उठाव कराया लागले
गावे सारी सिमावर्ती
सिमा विवाद निमीत्ते
मिळाली भारी युक्ती

दुसऱ्या राज्यां जातो
दाखवू पाहते भिती
विकास करा आमचा
कोलीत मिळते हाती

तिकडेआमिषे दावती
जोडावी नवीन नाती
स्वागता तयार झाले
बांधून मोठ्या कनाती

मिळाला नवीन रस्ता
रे नस दाबली दुखती
जे जे तलाव राखती
ते तेचं पाणी ही पिती

थोपवून धरा आपले
यातचं खर्चली शक्ती
दोष कुणाला द्यायचा
प्रत्येक स्वार्थी व्यक्ती

हक्काने मागून घ्यावे
आपलेचं बसले तख्ती
संधी कधीतरी येणारं
आत्ताच करावी सक्ती

नव्या घरोब्या करिता
नका विसरु जुनीनाती
कळेल तिकडे जाताचं
तीच खाण तीचं माती

**हेमंत मुसरीफ पुणे**

## समृद्धी..

महामार्ग समृध्दीचा
धावू लागली प्रगती
प्रत्यक्षअप्रत्यक्षपणे
अनेक क्षेत्राला गती

कित्येकांनारोजगार
साधे सिद्धी उन्नती
दळणवळणा वळण
कोरली नवीआकृती

पडे पाऊल भक्कम
मोठ्या मने स्विकृती
भल्यांना भले म्हणां
नको विरोध विकृती

बळीराजासुखावला
सोनेरी झाली माती
संधी द्वारे उघडली
चाव्या आपले हाती

अक्रा प्रकल्पसंकल्प
भविष्या दिली कृती
हातात घेऊनि हात
चाला सकला संगती

भले बडविले ढोलके
प्रसिद्धी विशेष प्रिती
कार्य वाखाणणी करे
उज्ज्वल असो निती

नाव बाळा साहेबांचे
आठव ऊरात दाटती
मार्गावरुन धावताना
आनंद लहरी उठती

**हेमंत मुसरीफ पुणे**

## साहित्य संमेलन..

न हे साहित्यसंमेलन
सजे जणूं तारांगण
साठवूनि पंच प्राण
ये चकोर रसीकगण

निरामय चंद्र किरण
शीतल हो अंतकरण
वेचू साठवू कणकण
न्हावू सुखे क्षणोक्षण

आगंतुक काही ढग
झाकोळ लावे ग्रहण
हवी संस्कृती रक्षण
लाऊ विचार कुंपण

मिळे विविध व्यंजन
साहित्यीक सुगरण
पंगती प्रपंच नसावे
नव रस करी गृहण

प्रस्थापित नवोदित
भेदाभेद नअकारण
साहित्यदेवते समोर
साधकचं सारे जण

पवित्र राहो परोपरी
सरस्वतीचे हे प्रांगण
वादा नको निमंत्रण
नको व्हाया रणांगण



**हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# खाना-खजाना करटुलं (कंटोल)

**साहित्य :** आठ ते दहा हिरवी कोवळी करटुलं (साधारण पाव किलो), अर्धी वाटी ओले खोबरे, एक वाटी बारीक चिरलेला कांदा, फोडणीकरता हिंग व मोहरी, मीठ, हळद, दोन-तीन चिरलेल्या मिरच्या, थोडंसं लाल तिखट, दोन टेबल स्पून तेल.



**कृती :** प्रथम करटुलांचे अर्धे भाग करून त्यातील गर काढून टाकावा. नंतर बटाटय़ाचे काप केल्याप्रमाणे करटुलं चिरून घ्यावीत व थोडंसं मिठ लावून धुवून घ्यावीत. पॅनमध्ये तेल गरम करुन हिंग, मोहरी, थोडेसे जीरे टाकून फोडणी घालावी, त्यात चिरून घेतलेल्या हिरव्या मिरच्याही टाकाव्यात. नंतर त्यात कांदा, मिठ, थोडेसे लाल तिखट व हळद घालून चांगले परतावे. चिरलेली करटुलं त्यात घालून पुन्हा परतावीत. झाकण ठेवून चांगली वाफ येऊ द्यावी. नंतर झाकण काढून मंद गॅसवर तीन ते चार मिनिटे भाजी पाणी न घालता परतावी. वरून ओले खोबरे व चवीपुरती साखर घालावी.

# भारतीय मजदूर संघाचा विधानभवनावर २८ डिसेंबरला महामोर्चा

**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**नागपूर :** सरकारच्या कामगारविरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठी भारतीय मजदूर संघाचा विधान भवनावर बुधवार, २८ डिसेंबरला महामोर्चा निघणार आहे. संकल्प यात्रेचा माध्यमातून हिवाळी अधिवेशनात हा मोर्चा सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडियम, धंतोली नागपूर येथून प्रारंभ होऊन विविध मार्गाने विधानसभेवर महामोर्चा धडकेल. या मोर्चात ३० हजारच्या अधिक संख्येने कामगार सहभागी होतील, अशी माहिती विदर्भ प्रदेश अध्यक्षा शिल्पा देशपांडे आणि विदर्भ प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार यांनी नागपुरात झालेल्या कार्य समितीच्या बैठकीत दिली.

भारतीय मजदूर संघ विदर्भ प्रदेश अध्यक्षा शिल्पा देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मोर्चाचे नेतृत्व भारतीय मजूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिंमते, राष्ट्रीय उपाध्यक्षा नीता चौबे, राष्ट्रीय मंत्री अशोक शुक्ला, प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार, भा. म. सं.चे ज्येष्ठ मार्गदर्शक व वरिष्ठ नागरिक परिसंघाचे राष्ट्रीय महामंत्री वसंत पिंपळापुरे हे करणार आहे.

केंद्र शासनाच्या वतीने देशातील सार्वजनिक उद्योगांचे मोठ्या प्रमाणात खासगीकरण करण्यात येत आहे. याचा विरोध प्रकट करण्याकरिता आणि राज्य शासनाच्या विविध उद्योगात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कामगारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण सुरूच आहे. त्यांना न्याय मिळावा व या व्यतिरिक्त राज्य शासनाच्या विविध खात्यात व मंडळात कार्यरत असणाऱ्या कर्मचारी तसेच विविध खासगी औद्योगिक संस्थेत कंपनीत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध समस्याबाबत न्याय मागण्यांकरिता या महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

**संकल्प यात्रा आज**

संकल्प यात्रेचा शुभारंभ येत्या सोमवार, १२ डिसेंबरला भारतीय मजदूर संघाचे संस्थापक शर्द्धेय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जन्मगाव वर्धा जिल्ह्यातील आर्वी या गावातून होईल. ही संकल्प यात्रा विदर्भाच्या ११ जिल्ह्यामधून जाणार आहे. तेथून ऊर्जा घेऊन शर्मिकांच्या समस्येला न्याय मिळावा आणि जनजागृती व्हावी, हा संकल्प यात्रेचा उद्देश आहे. पूर्व विदर्भ आणि पश?चिम विदर्भ असे दोन भाग करण्यात आले. प्रदेशातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यातून भारतीय मजदूर संघाचे जवळपास २० हजाराच्या जास्त संख्येने संघटित व असंघटित क्षेत्रातील कर्मचारी, कामगार, शेतमजूर या महामोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती भारतीय मजदूर संघाचे प्रसिद्धी प्रमुख सुरेश चौधरी यांनी दिली.

# इसापूर येथील मोलमजुरी करणारा भाजपा कार्यकर्ता सरपंच पदावर विराजमान

**इसापूर येथील नितीन वसंतराव गंभीर यांची इसापूर येथे सरपंच पदी बिनविरोध निवड**



**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**देवळी :** भारतीय जनता पार्टीमध्ये सर्वसामान्य कार्यकर्त्याला महत्वाचे स्थान आहे, एक चायवाला पंतप्रधान बनले, माझ्या सारख्या कुस्तीपटूला खासदार बनविले त्यामुळे भाजपा असा पक्ष आहे ज्यामध्ये परीवारवाद नाही, त्यामुळे आज एक मोलमजुरी करणारा भाजपा सर्वसामान्य कार्यकर्ता नितीन इसापूरच्या सरपंची पदी निवड झाली असल्याचे यावेळी खासदार रामदास तडस म्हणाले.

आज जनसंपर्क कार्यालय, देवळी येथे भारतीय जनता पार्टीचा सर्वसामान्य कार्यकर्ता नितीन वसंतराव गंभीर यांची इसापूर येथे सरपंच पदी बिनविरोध सदस्य म्हणून अनिल सुरेशराव सावरकर व नांदोरा ग्रामपंचायत मध्ये आचल सुभाषराव रंगारी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे खासदार रामदास तडस यांनी स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपा प्रदेश सचिव राजेश बकाने, तालुका अध्यक्ष दशरथ भुजाडे, माजी न.प.उपाध्यक्ष डॉ.नरेन्द्र मदनकर, शहर अध्यक्ष रवी कारोटकर, नंदकिशोर वैद्य, माजी जि.प.सदस्य सौ. मयुरी मसराम, माजी जि.प.सदस्य चंदू पोटे उपस्थित होते.

सरपंच बिनविरोध निवडीकरिता पंकज तडस यांनी प्रयत्न केले. व त्यांच्या प्रयत्नामुळे नितीन वसंतराव गंभीर यांची इसापूर येथील सरपंच पदी निवड झाली.

यावेळी रुपेश वैद्य, गणेश आंबटकर, संजय बिजवार, अक्षय बिजवार, नानाजी थोटे, संदिप चावरे, क्रीष्णा भुजाडे, नामदेव गोबाडे, नंदकुमार भस्मे, उमेश चावरे, सागर कुडवे, अंजिक्य भोयर, प्रशांत ठाकरे, प्रमोद ठाकरे, जयंत चौधरी, धनराज चितोडे, वसंतराव कोरडे, शैलेश डंभारे, गजानन रुद्रकार, खुशाल सांळुके उपस्थित होते

# यंदा प्रथमच मातंग समाज निवडणुकीत

**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**अरोली :** कोदामेंढी ग्रा. पं.च्या इतिहासात अनुसूचित जाती (एससी) या प्रवर्गातून येणाऱ्या मातंग समाजातील अनेक उमेदवारांनी निवडणूक लढविली. मात्र, एससी प्रवर्गातील इतर समाजातील उमेदवारांनी त्यांनी पराभूत केला. त्यामुळे आजपर्यंत मातंग समाज ग्रा. पं.मध्ये प्रवेश करूशकला नाही.

मात्र, यंदा दोन पॅनलमध्ये सरळ काट्याची टक्कर असून, दोन्ही पॅनलमध्ये एससी प्रवर्गातून मातंग समाजाचेच उमेदवार एकमेकांविरोधात लढत आहेत. त्यामुळे यंदा प्रथमच मातंग समाज ग्रा. पं. निवडणुकीत छाप पाडणार असल्याचे चित्र आहे.

वॉर्ड क्र. ३ मध्ये पॅनलकडून कोमल पंकज खडसे यांच्याविरोधात ग्रामविकास परिवर्तन पॅनलकडून सुनंदा अशोक बावणे एकमेकाविरोधात लढत आहेत. या दोघीही शेजारीच राहत असून, ते एकमेकांचे नातेवाईक आहेत. सुनंदा बावणे या कोमल खडसे यांच्या काकू आहेत. (सध्या नव्हे, पारिवारीक संबंधाने) सुनंदा बावणे यांनी मागची पंचवार्षिक निवडणूक लढविली होती. त्यात निवडणुकीत त्याचा पराभव झाला होता. तर कोमल खडसे या प्रथम निवडणुकीत लढवित आहे. त्यामुळे अनुभवी काकू विरूद्ध नवखी पुतणी अशी लढत वॉर्ड क्र.३ मध्ये होणार आहे.

दोन्ही पॅनलचे सर्व उमेदवारांसह सरपंच पदासाठी उभे असलेल्या तिनही स्वतंत्र उमेदवारांनी सोशल मीडियासह घरोघरी जाऊन प्रचाराला सुरुवात केली आहे. गावातील चारही वॉर्डात चौकाचौकात बॅनर पोस्टर लावणे सुरू असून, जणू निवडणूक महोत्सव सुरूझाल्यासारखे वातावरण दिसत आहे. खेळीमेळीच्या वातावरणात व शांततेत निवडणूक सुरूआहे.

# नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, देवळी येथे 'मायेची ऊब' या उपक्रमातंर्गत विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

**स्थानिक नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, देवळी येथे दिनांक १० डिसेंबर २०२२ ला 'मायेची ऊब' या सदराखाली स्वेटर वाटप कार्यक्रम पार पडला.**





**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**देवळी :** नगर परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, देवळी येथील सेवानिवृत्त शिक्षक व काही सेवेत सेवेत असणाऱ्या शिक्षकांनी 'मायेची ऊब' या सदराखाली शाळेतील गरीब व गरजु विद्यार्थ्यांचे थंडी पासुन स्वरक्षण व्हावे, या हेतुने शाळेच्या सेवानिवृत्त कला शिक्षिका कुमुदिनी काकडे व सेवानिवृत्त शिक्षक प्रकाश खोडके यांच्या संकल्पनेतुन साकरलेल्या उपक्रमाला प्रत्येकी रु. १०,०००/- देवून पतपेढी निर्माण केली. सन २०२२ पर्यंत रू. २,६०,०००/- या पेढीमध्ये गोळा झालेले आहेत. त्या निधीच्या व्याजातून दरवर्षी विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात येते. या उपक्रमातंर्गत यावर्षी सुध्दा ८२ विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले. सदर उपक्रम गेल्या २२ वर्षापासून सुरू आहे, हे विशेष.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून देवळी नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सुचितातार्इ मडावी, प्रमुख अतिथी माजी नगराध्यक्षा तथा गटनेत्या सौ. शोभाताई तडस, तर भाजप शहर अध्यक्ष रविभाऊ कारोटकर यांनी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दर्शवित 'मायेची ऊब' या उपक्रमाला पेढीमध्ये रू. १०,०००/- दान दिले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या उपमुख्याध्यापिका कु. निलिमा कपुर तर 'मायेची ऊब' या उपक्रमाची रुपरेक्षा प्राचार्य राजेंद्र मसराम यांनी सांगितली असून पर्यवेक्षिका कल्पना मुंजेवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कला शिक्षक मनोज बरडे यांनी तर अतिथिचे आभार प्रदर्शन जेष्ठ शिक्षिका उज्वला धोपटे यांनी केले.

ा ा र्य ा ा ा च ा ा यशस्वीतेकरिता शाळेचे शिक्षक रामभाऊ कदम, दिलिप तागडे, प्रा. पंकज चोरे, प्रा. विलास आडे, प्रा. संजय चव्हाण, गजानन साबळे, भगवंत खडसे, संजय कुबडे, निरजकुमार जयस्वाल, सौ. वर्षा मेश्राम, निकहत खाँ, सौ. मिना कुभांरे, अल्का बल्लमवार, यशवंत लाडेकर, प्रकाश पाचडे, सौ. प्रतिभा मेहेरकुरे, सौ. विद्या उईके, सौ. वैशाली धवणे, परमेश्वर केंद्रे, प्रविण गजभिये, समिर चोरे, अशोक झाडे, गणतप कुरवाडे आदींचे सहकार्य लाभले.

# आजादीच्या अमृत महोत्सवानिमित्त ज्येष्ठ शिक्षकांचा सत्कार समारंभ

**जिल्ह्यातील ७५ वर्षांवरील शिक्षकांची सत्काराकरिता निवड**

**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**काटोल :** आजादीका अमृत महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उच्च श्रेणी मुख्याध्यापक व सेवानवृत्त प्राथमिक शिक्षक महासभा पं. स. नागपूर, अंतर्गत ७५ वर्षांवरील सेवानवृत्त शिक्षकांचा भव्य सत्कार समारंभ सोमवार, १२ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १२ वाजता 'महात्मा फुले सांस्कृतिक सभागृह' रेशीमबाग, नागपूर येथे संपन्न होत आहे

उद्घाटक म्हणून माजी मंत्री सुनील केदार, विधान परिषद आमदार अँड. अभिजित वंजारी, जि. प. अध्यक्ष मुक्ता कोकर्डे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, जि. प. उपाध्यक्ष कुंदा राऊत, शिक्षण व अर्थ सभापती राजकुमार कुसुंबे, महिला बालकल्याण सभापती अवंतिका लेकुरवाळे, समाजकल्याण सभापती मिलिंद सुटे, शिक्षणाधिकारी प्राथमिक रोहिनी कुंभार आदी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती संघटनेचे तालुका प्रमुख व सल्लागार विनोद राऊत यांनी कार्यक्रमाबाबत माहिती दिली. जिल्हाध्यक्ष अशोक दगडे, तालुकाध्यक्ष आर. बी. किटे, सरचिटणीस संजय भेंडे, मार्गदर्शक रामभाऊ ठाकरे, जिल्हा सरचिटणीस दीपक सावळकर, कार्याध्यक्ष दीपक तिडके, मुख्य सल्लागार सरिता किम्मतकर, सुनीता दामले, जयश्री कावळे, आर. जे. भोळे,माणिक ठाकरे, राजेंद्र चंदनगिर, योगेश?वर कामडी, सेवानवृत्त शिक्षकांच्या या सामाजिक कार्यात संघटनेनी घेतलेली दखल व सत्काराबद्दल शिक्षण क्षेत्रात कौतुक होत आहे.

# प्रशासनाच्या अनागोंदीविरोधात वंचितचे जबाब दो आंदोलन



**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**यवतमाळ :** गेल्या अनेक वषार्पासून घाटंजी तालुक्यातील शेतकरी निसर्गाच्या अपकृपेने व राज्यकर्त्यांच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे मेटाकुटीस आलाआहे. चालू वर्षीच्या जुलै ऑगस्ट महिन्यातील अति पावसामुळे शेतकऱ्यांची सोयाबीन,कापूस ,व तूर ही पिके बरबाद झाली. राज्य शासनाने अतवृष्टीची तोकडी मदत जाहीर केली या मदतीने शेतकऱ्यांना पिकाची नुकसान भरपाई भरून निघाली नाही परंतु ऐन अडचणीच्या वेळी म्हणजेच दिवाळीपूर्वी सदर अतवृष्टीची मदत मिळाली असती तर बरं झालं असतं. परंतु महसूल प्रशासनाच्या, तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या व बँक अधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे सदर रक्कम दिवाळी होऊन दीड महिना लोटूनही बऱ्याच शेतकऱ्यांच्या खात्यात दमडीही जमा झाली नाही, वाढीव अतवृष्टीचा निधी सुद्धा तालुक्याला येऊन त्याचे सुद्धा वाटप करण्यास प्रशासन दिरंगाई करीत आहे. या प्रलंबित, ज्वलंत प्रश्नासंदर्भात तहसीलच्या प्रांगणात शेतकरी दरबारच्या माध्यमातून जबाब दो आंदोलनवंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष संघपाल कांबळे यांच्या नेतृत्वात व जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग निकोडे यांच्या मार्गदर्शनात शेतकरी आघाडी तालुकाध्यक्ष निलेश कडू, महासचिव नितीन राठोड, संघटक प्रेमानंद उमरे, शहराध्यक्ष अनिल रामटेके, राजू दीडसे, सुधीर गुरनुले, रामचंद्र लेनगुरे, विकास सोनुले व अनेक कार्यकर्ते, शेतकरी बांधव हजर होते. आंदोलनाची दखल घेत महसूल प्रशासनाकडून मा. राठोड साहेब नायब तहसीलदार, स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर नरेंद्र मेर्शाम यांनी जबाब दो आंदोलनाला उत्तर दिले, या प्रलंबित प्रश्नाच्या संदर्भात महसूल प्रशासनाकडून अतवृष्टीचा वाढीव निधी १५ कोटी ९६ लाख रुपये जमा झाल्याचे सांगितले.

तहसील कार्यालयाकडून आता स्टेट बँकेच्या खात्यातून रक्कम वळती न करता तालुक्यातील सर्वच बँकेला खातेदाराच्या यादीनुसार सदर रक्कम टाकण्याचा सोपा उपाय तहसील कार्यालयाने तयार केला आहे असे महसूल प्रशासना कडून सांगण्यात आले व या आठ दिवसात तालुक्यातील शेतकऱ्याचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे लेखी आश?वासन दिले.

# आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेची क्षमता बांधणी महत्त्वाची : प्रधान सचिव गुप्ता



**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**गोंदिया :** राज्यात यावर्षी २०२२ मध्ये मानसून कालावधी दरम्यान पूर परिस्थिती हाताळण्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या योग्य समन्वयाने पूर परिस्थिती हाताळण्यास यश आले. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेची भूमिका महत्त्वाची असून, सदर यंत्रणेची क्षमता बांधणी महत्वाची असल्याचे प्रतिपादन राज्याचे प्रधान सचिव (आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन) असीम गुप्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाची पाहणी दरम्यान केले.

यावेळी जिल्हाधिकारी नायना गुंडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, अधीक्षक संजय धार्मिक, दीपक परिहार व शोध बचाव दलाचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे गुरुवार, ८ डिसेंबर रोजी प्रधान सचिव गुप्ता यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदियाची विविध आपत्तीसाठी व आपत्ती दरम्यान करण्यात आलेली तयारीचे निरीक्षण करण्यासाठी जिल्हा नियंत्रण कक्षाला भेट दिली.

यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षात भेट देऊन पूर परिस्थितीमध्ये सुरक्षा व बचाव करण्यासाठी उपयोगी साहित्यांची पाहणी करून सखोल माहिती घेतली. तसेच नियंत्रण कक्ष २४७७ कार्यरत ठेवून शोध व बचाव पथकामार्फत आपत्ती प्रसंगी गरजूंना तत्काळ मदत कशी दिली जाते? हे जाणून घेतले.

पाहणी दरम्यान जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी पूर परिस्थितीबाबत माहिती देताना सांगितले की, जिल्ह्यातील ९६ गावांना पुराचा संभाव्य धोका आहे. वैनगंगा व बाघ नदीच्या काठावर असलेले गोंदिया आणि तिरोडा तालुक्यातील गावांमध्ये संभाव्य पुराचा धोका असतो.

मध्यप्रदेश राज्यातील जिला शिवनी येथील संजय सरोवर जलाशयमधून सोडण्यात येणाऱ्या पाणीमुळे मान्सून कालावधीत पुराचा संभाव्य धोका असतो .

जिल्ह्यात येणाऱ्या विविध आपत्तीमध्ये आपत्तीची तीव्रता कमी करून जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जनजागृती कार्यक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, रंगीत तालीमेद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रधान सचिव गुप्ता यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाद्वारे पूर परिस्थिती दरम्यान करण्यात येणारी कामे, नागरिकांना सुरक्षित हलविण्याकरिता करण्यात येणारी उपाय योजना व पूरपरिस्थिती दरम्यान शोध व बचाव कामात उपयोगी बोट, लाईफ जॉकेट, लाइफ बॉय, इमरजेंसी लाईट, डइट मशीन, मेगाफोन, सॅटॅलाइट फोन व घरघुती साहित्यापासून तयार करण्यात आलेले फ्लोटिंग डिवाईस इत्यादी साहित्यांची माहिती घेऊन जिल्हा प्रशासनाचे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाचे कौतुक केले.

येणाऱ्या काळात थंडीचे प्रमाण वाढल्यास शीतलहर तसेच उन्हाळ्यात उष्णलहर यामुळे उद्धवणाऱ्या आपत्तीच्या प्रसंगी जिल्हा प्रशासनाने पूर्वनियोजन करून मानक कार्यपद्धतीचे पालन करून आराखडा तयार करावे व नागरिकांमध्ये योग्य प्रमाणात जनजागृती करावी. तसेच इन्सिडेंट रीस्पोंस सिस्टीम (कफर) या नवीन प्रणालीचे वापर करून विविध विभागांची माहिती (डेटाबेस) तसेच विविध आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीची माहिती अद्यावत ठेवावी, अशी सूचना प्रधान सचिव गुप्ता यांनी यावेळेस दिली.

# शाळकरी विद्यार्थिनीशी अभद्र व्यवहार करणाऱ्यास अटक

**साहसिक वृत्त/ ११डिसेंबर**

**नागपूर :** अल्पवयीन शाळकरी विद्यार्थिनीच्या ओळखीचा फायदा घेत तिला फिरायला घेऊन जात तिच्याशी अभद्र व्यवहार करून त्याचे मोबाईलमध्ये चित्र टिपून मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला जुनी कामठी पोलिसांनी अटक केली आहे.

अनुप अन्नादास डोंगरे (वय २७) रा. जेपीनगर कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. जुनी कामठी परिसरात राहणाऱ्या ५० वर्षीय फिर्यादीची १४ वर्षीय मुलगी ही शाळेत गेली असता, आरोपीने तिच्या शाळेत जाऊन फिरायला जाण्याचा बहाणा करीत तिला खिंडसीला घेऊन गेला. तिथे आरोपीने मुलीसोबत अभद्र व्यवहार करून त्याचे मोबाईलमध्ये चित्र टिपले. पीडित मुलीने आरोपीकडे घरी जाण्याचा तगादा धरूनही त्याने तिला घरी परत न नेता शाळेत सोडून दिले. घडलेला संपूर्ण प्रकार पीडितेने आपल्या पालकांकडे सांगितला. याप्रकरणी पीडितेच्या कुटुंबीयांच्या तक्रारीवरून जुनी कामठी पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्ह्याची नोंद करून त्याला अटक करण्यात आली आहे.

### मालिका हरली ; पण शेवट झाला गोड...

# तिसऱ्या वनडेमध्ये बांगलादेशावर २२७ धावांनी दणदणीत विजय

**चितगाव (वृत्तसंस्था) :**

इशान किशनचे झंझावाती वादळी द्विशतक आणि विराट कोहलीच्या शतकानंतर शार्दूल ठाकूर आणि अक्षर पटेल यांच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर भारताने तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात २२७ धावांनी विजय मिळवला आहे. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या भारतीय संघाने बांगलादेशसमोर ४१० धावांचा डोंगर उभा केला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत बांगलादेशच्या संघाचा अवघ्या १८२ धावांवर फडशा पाडला. इशान किशन हा भारताच्या विजयाचा नायक ठरला. २४व्या षटकातील पहिल्या चेंडूवर किशनने चौकार ठोकला आणि त्याने ८५ चेंडूत एकदिवसीय कारकिर्दीतील पहिले शतक पूर्ण केले.

दरम्यान, ४१० धावांचे लक्ष्य रोखण्यासाठी मैदानात उतरलेल्या भारतीय गोलंदाजांनी बांगलादेशच्या फलंदाजांना जखडून ठेवले. ५० धावांच्या आत बांगलादेशच्या दोन फलंदाजांना माघारी धाडून भारताने सामन्यावर मजबूत पकड बनवली. बांगलादेशकडून ऑलराऊंडर शाकीब अल हसन याने सर्वाधिक ४५ धावांची खेळी केली. कुलदीप यादवनेच त्याला बाहेरचा रस्ता दाखवला. शाकीबव्यतिरिक्त बांगलादेशच्या कोणत्याही फलंदाजाला जास्त वेळ क्रिझवर टिकता आले नाही. या मालिकेतील दोन्ही सामन्यात भारतासाठी विलन ठरलेला मेहंदी हसन याला उमरान मलिकने स्वस्तात माघारी धाडले. बांगलादेशचा संघ ३४ व्या षटकात १८२ धावांवर ढेपाळला. भारताकडून शार्दूल ठाकूर याने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर अक्षर पटेल आणि उमरान मलिकने प्रत्येकी दोन-दोन विकेट्स मिळवल्या. याशिवाय, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव आणि वॉशिंग्टनच्या खात्यात प्रत्येकी एक - एक विकेट जमा झाली.

### धुवाधार फलंदाजी – भेदक गोलंदाजीचा नजारा...



#### इशान - विराटकडून धुलाई...

नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या भारताची सुरुवात खराब झाली. भारताला ४.१ षटकात सलामीवीर शिखर धवनच्या रुपात पहिला धक्का बसला. मात्र त्यानंतर इशान किशन आणि विराट कोहली यांनी भारताचा डाव सावरला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी मोठी भागिदारी रचत भारताची धावसंख्या ३०० पार पोहोचविण्यात मदत केली. भारताच्या डावातील ३६ षटकांतील अखेरच्या चेंडूवर इशान किशन आऊट झाला. एका बाजूने पाठोपाठ विकेट पडत असताना विराट कोहलीने संघाची दुसरी बाजू संभाळून ठेवली. या सामन्यात श्रेयस अय्यर (३ धावा) आणि कर्णधार केएल राहुल (८ धावा) बाद झाला. त्यानंतर ४१व्या षटकात विराट कोहलीदेखील शाकीब अल हसनच्या गोलंदाजीचा शिकार झाला. भारताने निर्धारित ५० षटकांत ८ विकेट गमावून बांगलादेशसमोर ४१० धावांचे मोठे लक्ष्य ठेवले. बांगलादेशकडून तस्कीन अहमद, हुसेन आणि शाकीब अल हसनने प्रत्येकी दोन - दोन विकेट्स घेतल्या, तर मुस्ताफिजुर रहमान आणि मेहंदी हसनच्या खात्यात एक-एक विकेट जमा झाली.

**कर्णधार बदलला, नशिबही बदलले...**
तिसऱ्या वनडेत भारताचा कर्णधार बदलला व त्यांचे नशिबही बदलल्याचे आता पाहायला मिळाले. कारण गेल्या दोन्ही सामन्यांत रोहित शर्मा कर्णधार असताना भारताला पराभव पत्करावे लागले होते. पण आज रोहित शर्माविना भारतीय संघ मैदानात उतरला व यावेळी भारतीय संघाला विजय मिळाला. भारताचा हा या मालिकेतील पहिला विजय असला तरी मालिका मात्र गमावलेली आहे.

# एका शतक अन् दोन रेकॉर्ड

### विराटने बांगलादेशविरुद्ध केला आगळावेगळा विक्रम



**ढाका (वृत्तसंस्था) :**

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली याने बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या आणि अखेरच्या वन डे सामन्यात आंतरराष्ट्रीय करिअरमधील ७२वे शतक पूर्ण केले. विराटने ९१ चेंडूत २ षटकार आणि ११ चौकारांसह ११३ धावा केल्या. विराटचे हे आंतरराष्ट्रीय करिअरमधील ७२वे शतक ठरले. या शतकासह त्याने दोन मोठे विक्रम देखील केले.

या सामन्यात विराट कोहलीने असा एक विक्रम केला जो आजवर एकाही भारतीय खेळाडूला करता आलेला नाही. विराटने १६वी धाव घेताच हा खास विक्रम त्याच्या नावावर झाला. बांगलादेशच्या भूमीवर वनडेत विराटने १ हजार धावा पूर्ण केल्या. आजवर एकाही भारतीय फलंदाजाला बांगलादेशमध्ये १ हजार धावा पूर्ण करता आलेल्या नाहीत. इतकेच नाही, तर कोहली हा जगातील फक्त दुसरा फलंदाज आहे ज्याने बांगलादेशच्या भूमीवर १ हजारपेक्षा जास्त धावा केल्या आहेत. याआधी अशी कामगिरी श्रीलंकेच्या कुमार संगकारा याने केली होती.

संगकाराने २१ वनडेत ५२.२५च्या सरासरीने १ हजार ४५ धावा केल्या आहेत. यात ३ शतक आणि १० अर्धशतकांचा समावेश आहे. बांगलादेशमध्ये १ हजार धावा पूर्ण केल्यानंतर त्याने संगकाराला देखील मागे टाकले. बांगलादेशमध्ये वनडेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्वतःच्या नावावर केला. बांगलादेशच्या आधी विराटने ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये वनडेत १ हजार धावांचा टप्पा पार केला आहे. ऑस्ट्रेलियात त्याने १ हजार ३२७, तर इंग्लंडमध्ये १ हजार ३४९ धावा केल्या आहेत.



# इशान किशन नावाचं, तुफान आलंया....

### एक संधी मिळाली आणि पठ्ठ्याने झळकावले पहिले द्विशतक

**चितगाव (वृत्तसंस्था) :**

भारत विरुद्ध बांगलादेशमध्ये तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना चितगाव येथे खेळवला गेला. बांगलादेशने सुरुवातीचे २ सामने जिंकल्याने त्यांनी मालिका जिंकली आहे, तर भारतीय संघ अद्याप विजयाच्या प्रतीक्षेत असल्याने आजच्या सामन्यात विजय मिळवण्याच्या हेतूने संघ उतरला आणि या विजयासाठी भारताचे फलंदाज बांगलादेशच्या गोलंदाजांवर तुटून पडले. त्यात इशान किशनच्या झंझावातापुढे आज बांगलादेशचा प्रत्येक गोलंदाज फिका पडलेला दिसला.

यजमान बांगलादेश संघाने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारताकडून इशान किशन आणि शिखर धवन ही जोडी प्रथम फलंदाजीला आली. या सलामी जोडीमधील इशानने सुरुवातीपासूनच फटकेबाजीला सुरुवात केली. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात इशान किशनने ८५ चेंडूत शानदार शतक झळकावले. त्याचे वनडे कारकिर्दीतील हे पहिले शतक आहे. त्याने १५ चौकार आणि २ षटकार लगावत सर्वांनाच आपला फॉर्म दाखवून दिला.

इशानने २४ व्या षटकात आपले पाहिले शतक झळकावले, तर २८ व्या षटकात त्याने १५० धावा पूर्ण केल्या, तर आता ३५व्या षटकामध्ये त्याने आपले द्विशतक झळकावले आहे. यामध्ये त्याने २३ चौकार आणि ९ षटकार लगावले. त्याच्या या खेळीने सर्वांनाच चकित केले आहे. इशान किशन हा बांगलादेशविरुद्ध मोठी खेळी करणारा फलंदाज ठरला आहे.

इशानने उत्साहात आपले शतक झळकावताच त्याच वेळी नॉन स्ट्राइकवर उभा असलेला विराट कोहली तरुण इशानचा शानदार सेलिब्रेशन पाहून हसताना दिसला. कोहलीने इशानकडे जाऊन त्याच्या शतकाबद्दल अभिनंदन केले आणि त्याला मिठी मारली. यावेळी इशानचा चेहरा चांगलाच चमकला होता. अलीकडच्या काळात भारतीय संघ सलामीच्या जोडीबाबत खूप संघर्ष करत आहे. बांगलादेशविरुद्धच्या ३ वनडे सामन्यात ३ वेगवेगळ्या सलामी जोडी उतरवल्या गेल्या. रोहित दुखापतीने त्रस्त असताना दुसरीकडे धवन व केएल राहुलचा फॉर्म अजिबात चांगला दिसला नाही. अशा स्थितीत इशानचे शतक भारतासाठी दिलासा देणारे आहे. भारतीय संघाला पुढील वर्षी विश्वचषक खेळायचा आहे. अशा स्थितीत इशानचे यश भारतीय संघ व्यवस्थापनासाठी आनंदाची बाब आहे.

ऑफस्पिनर मेहिदी हसनने शिखर धवनला एलबीडब्ल्यू केले. मैदानावरील पंचांनी आऊट दिले नाही. पण यानंतर बांगलादेशने रिव्ह्यू घेतला व धवन पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने ८ चेंडूत ३ धावा केल्या. धवन लवकर बाद झाल्यानंतर किशन आणि कोहलीने दमदार फलंदाजी करत भारतीय डाव सांभाळला.

दोघांमध्ये दुसऱ्या विकेटसाठी २९० धावांची विक्रमी भागीदारी झाली. दोघांमधील भागीदारी भारतासाठी तिसरी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सातवी सर्वोच्च भागीदारी आहे. भारतासाठी पहिल्या क्रमांकाची सर्वोच्च भागीदारी (३३१ धावा) सचिन आणि द्रविड यांच्यात न्यूझीलंडविरुद्ध १९९९ मध्ये झाली होती.

इशान किशनची एकदिवसीय सामन्यातील ही ९वी खेळी आहे. त्याने आतापर्यंत ३ अर्धशतके व १ शतक झळकावले आहे. म्हणजेच तो प्रत्येक दुसऱ्या डावात ५०हून अधिक धावांची इनिंग खेळताना दिसला. या सामन्यापूर्वी इशानने एकदिवसीय सामन्यांच्या ८ डावांत ३३ च्या सरासरीने २६७ धावा केल्या आहेत. ९३ धावा ही त्याची आतापर्यंत सर्वोत्तम खेळी होती. त्याने २१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५८९ धावा केल्या आहेत आणि ४ अर्धशतके झळकावली आहेत.

**क्रिकेट वेडापायी शाळेने टाकले काढून...**
आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद द्विशतक झळकावणाऱ्या इशान किशन याने खेळासाठी शाळा सोडली. इशानची क्रिकेटची आवड पाहून शिक्षकही हैराण झाले होते. वारंवार वर्गात उभे राहिल्यानंतरही इशान मैदानावर जाणे कमी करीत नव्हता. त्यामुळे अभ्यास आणि क्रिकेट एकत्र जाऊ होऊ शकत नाही, हे शिक्षकांनी त्याला स्पष्टच सांगितले. आपण खेळासाठी अभ्यास सोडू शकतो, असे इशानने शिक्षकांना सांगितले होते. त्यानंतर त्याने क्रिकेटसाठी शाळा सोडली होती. इशानला लहानपणापासूनच क्रिकेटचे वेड आहे. त्याची क्रिकेटची आवड एवढी होती की, तो अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकत नव्हता. त्याच्या या आवडीमुळे तो अभ्यासात मागे पडला. इशान किशनने पटनाच्या दिल्ली प्रायमरी स्कूलमधून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पटना येथील कॉलेजमधून त्याने पुढील शिक्षण पूर्ण केले. क्रिकेटसाठी तो सगळे खाणे-पिणे विसरून जायचा. त्याला क्रिकेटपेक्षा काहीही महत्त्वाचं नाही, असे वाटत होते. इशानच्या क्रिकेट वेडामुळे त्याला शाळेतून काढून टाकण्यात आले. शाळेतून काढून टाकल्यानंतरही इशानला त्रास झाला नाही. कारण त्याची बॅट एक ना एक दिवस भारतासाठी इतिहास घडवेल, हे त्याला माहीत होते.

### ख्रिस गेलचा झंझावाती द्विशतकाचा विश्वविक्रही मोडला...



भारतीय संघाने तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात धावांचा डोंगर उभा केला. टीम इंडियाचा युवा फलंदाज ईशान किशनने या सामन्यात यजमान संघाच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली आणि २१० धावांची तुफानी खेळी केली. चितगावच्या जहूर अहमद चौधरी क्रिकेट स्टेडियममध्ये किशनने सलामीवीराची जबाबदारी पार पाडली आणि त्याची ही शानदार खेळी पाहून सर्वच थक्क झाले. यादरम्यान किशनने ख्रिस गेल याच्या झंझावाती द्विशतकाचा विश्वविक्रही मोडीत काढला.

झारखंडकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणाऱ्या इशान किशनने सुरुवातीपासूनच आपली खेळी दाखवायला सुरुवात केली. त्याचा खेळण्याचा अंदाज पाहून आज किशन मोठी इनिंग खेळण्याच्या उद्देशाने मैदानात उतरल्याचे सर्वांना समजले होते. किशनने १२६ चेंडूत द्विशतक पूर्ण केले, तर गेलने १३८ चेंडूत द्विशतक झळकावले होते. इशानने अशारीतीने मोठा विश्वविक्रम आपल्या नावे केला. इशानला रोहित जखमी झाल्याने संघात घेतले होते आणि त्याने रोहितच्या जागी सलामीला जाऊन मिळालेल्या संधीचे सोने केले.

# नेमारच्या गोलनंतरही ब्राझील संघ वर्ल्डकपच्या बाहेर ; क्रोएशिया उपांत्य फेरीत

**दोहा (वृत्तसंस्था) :**



नेमारने क्रोएशियाविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात आपले सर्व कसब पणाला लावले. नेमारने अतिरिक्त वेळेत अफलातून गोल केला आणि त्यामुळेच ब्राझीलला या वर्ल्डकपच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवता आले असते. नेमारने हा गोल केला, पण क्रोएशियाने त्यानंतर बरोबरी केली. त्यानंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्ये मात्र क्रोएशियाने ४ - २ अशी बाजी मारली आणि सेमीफायनल गाठली. मात्र ब्राझीलचा संघ वर्ल्डकपच्या बाहेर फेकला गेला आहे.

नेमारच्या गोलनंतरही ब्राझीलचे वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात आले. पेनल्टी शूटआऊमध्ये रंगलेला सामन्यात क्रोएशियाने ४-२ अशी बाजी मारली आणि त्यामुळे ब्राझीलचा संघ वर्ल्डकपच्या बाहेर गेला. क्रोएशियाविरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात निर्धारित ९० मिनिटांमध्ये ब्राझीलला एकही गोल करता आला नाही. त्यामुळे ब्राझील हा सामना जिंकणार की नाही, अशी चिंता चाहत्यांना लागलेली होती.

पण निर्धारित वेळेनंतर खेळविण्यात आलेल्या अतिरिक्त वेळेत नेमारने दमदार पदलालित्य दाखवले आणि भन्नाट गोल केला. त्यानंतर क्रोएशियाने ११६व्या मिनिटाला गोल केला आणि सामना बरोबरीत झाला. हा सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला. पेनल्टी शूटआऊटमध्ये क्रोएशियाने बाजी मारली आणि तमाम फुटबॉल विश्वाला मोठा धक्का बसला. या सामन्याच्या अतिरिक्त वेळेत चाहत्यांना रंगतदार सामना पाहायला मिळाला. कारण ब्राझीलच्या नेमारने सामन्याच्या १०६व्या मिनिटाला भन्नाट गोल मारला. त्यामुळेच ब्राझीलला १-० अशी आघाडी घेता आली आणि त्यांच्या विजयाची शक्यता वाढली. पण ब्राझीलला या गोलचा आनंद जास्त काळ अनुभवता आला नाही. कारण सामन्याच्या ११६व्या मिनिटाला पेर्टोव्हिकने गोल मारला आणि क्रोएशियाने या सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली.

ब्राझील आणि क्रोएशिया यांच्यातील सामन्याच्या पहिल्या सत्रात चाहत्यांना तंत्रशुद्ध खेळाची मेजवानी मिळाली. कारण पहिल्या सत्रात ब्राझीलच्या संघाने तंत्रशुद्ध खेळ करत आक्रमण आणि बचाव यांचा योग्य समन्वय साधला. ब्राझीलने या पहिल्या सत्रात आक्रमणे केली खरी, पण त्यांना गोल करण्यात अपयश आले. दुसरीकडे क्रोएशिया पहिल्या सत्रात जास्त बचावात्मक दिसली. क्रोएशियाला पहिल्या सत्रात गोल करण्याच्या दोन संधी चालून आल्या होत्या, पण या संधीचे सोने मात्र त्यांना करता आले नाही. पहिल्या सत्रात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले आणि त्यामुळे पहिले सत्र गोल शून्यबरोबरीत संपले.

दुसऱ्या सत्रात दोन्ही संघांनी आक्रमणावर चांगला भर दिला. पण आक्रमण करत असताना दोन्ही संघांना चांगली रणनिती आखता आलेली नाही. खेळाडूंचे गोलवर जाणारे शॉट्स हे जास्त प्रभावी दिसत नव्हते. दुसऱ्या सत्रात क्रोएशियाचा संघ जास्त आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. कारण या सत्रात गोल करत सामना जिंकण्याचे स्वप्न ते पाहत होते. पण ब्राझीलने यावेळी उत्तम बचाव केला. त्यामुळेच क्रोएशियाच्या संघाला गोल करण्यात अपयश येत होते. या अपयशाचे रूपांतर खेळातही पाहायला मिळत होते. यावेळी दोन्ही संघांतील खेळाडू जास्त आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यामध्ये खेळाडूंच्या चुका झाल्या आणि पंचांनाही काही वेळा सामन्यात हस्तक्षेप करावा लागला. दुसऱ्या सत्रातही दोन्ही संघ गोल करण्यात अपयशी ठरले, त्यामुळे हा सामना अतिरिक्त वेळेत गेला.

### आंतर हॉस्पिटल क्रिकेट

## ओम्नी 'बी' ट्रॉफी : जसलोक हॉस्पिटल फायनलमध्ये

**मुंबई (प्रतिनिधी) :** आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुप व ओम्नी ग्लोबल स्पोर्ट्स मॅनेजमेंट आयोजित ओम्नी ट्रॉफी आंतर हॉस्पिटल बी डिव्हिजन टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश करताना जसलोक हॉस्पिटलने सेव्हन हिल्स हॉस्पिटलचे आव्हान २३ धावांनी संपुष्टात आणले. अष्टपैलू नितीन सोळंकी, रोहित जाधव, सचिन तोडणकर, अनिकेत कुटे यांच्या अप्रतिम खेळामुळे जसलोक हॉस्पिटल संघाचा विजय सुकर झाला. रोहित सोमार्डे, सुशांत गुरव, डॉ. इब्राहीम शेख यांनी ६ बाद १०२ धावांची उत्तम स्थिती



निर्माण करूनही सेव्हन हिल्स हॉस्पिटल संघाला पराभव पत्करावा लागला. नितीन सोळंकी व रोहित सोमार्डे यांना उपांत्य सामन्यातील उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार देऊन शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण व क्रिकेटपटू चंद्रकांत करंगुटकर यांनी गौरविले.

जसलोक हॉस्पिटलने अष्टपैलू सचिन तोडणकर (३६ धावा), अनिकेत कुटे (२५ धावा), रोहित जाधव (२१ धावा) यांच्या दमदार फलंदाजीमुळे मर्यादित २० षटकात ९ बाद १३२ धावा फटकाविल्या. सुशांत गुरव (२ बळी), विशाल सावंत (२ बळी), डॉ. हर्षद जाधव (१ बळी) आदींनी छान गोलंदाजी केली. विजयी धावांचा पाठलाग करताना सेव्हन हिल्स हॉस्पिटलची सुरुवात ५ बाद ३२ धावा अशी निराशाजनक झाली. तरी न डगमगता अष्टपैलू सुशांत गुरव (२० धावा), रोहित सोमार्डे (४० धावा) व डॉ. इब्राहिम शेख (१८ धावा) यांनी सेव्हन हिल्स हॉस्पिटलला (६ बाद १०२ धावा) विजयासमीप नेले; परंतु जसलोक हॉस्पिटलच्या अचूक गोलंदाजीने सेव्हन हिल्सचा डाव १९व्या षटकाला १०९ धावसंख्येवर गुंडाळला.

# जयदेव उनाडकटचे १२ वर्षांनी कसोटी पुनरागमन

**मुंबई (प्रतिनिधी) :**

टीम इंडिया आणि बांगलादेश यांच्यात सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेनंतर २ कसोटी सामनेही बांगलादेशमध्ये खेळवले जाणार आहेत. दुखापतींमुळे भारतीय संघामधील महत्त्वाचे खेळाडू संघाबाहेर गेले आहेत. त्यामुळे संघामध्ये पुन्हा बदल होताना दिसत आहेत. या मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) एक धक्कादायक निर्णय घेतला आहे. त्यांनी या मालिकेसाठी दुखापतग्रस्त सीनिअर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या जागी एका खेळाडूचा समावेश केला आहे, जो १२ वर्षांपूर्वी टीम इंडियासाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता.

**बीसीसीआयचा आणखी एक मोठा निर्णय**

टीम इंडियाचा सीनिअर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी हा खांद्याच्या दुखापतीमुळे एकदिवसीय मालिकेनंतर कसोटी मालिकेतूनही बाहेर पडला आहे. क्रिकबझच्या बातमीनुसार, त्याच्या जागी कसोटी संघात ३१ वर्षीय वेगवान गोलंदाज जयदेव उनाडकट याचा समावेश करण्यात आला आहे. २०१० मध्ये त्याने टीम इंडियासाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. जयदेवच्या नेतृत्त्वाखाली सौराष्ट्र संघाने यंदाचा विजय हजारे चषक दुसऱ्यांदा आपल्या नावे केला आहे.

जयदेव उनाडकट या ३१ वर्षीय डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने त्याची एकमेव कसोटी २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सेंच्युरियन येथे खेळली होती. तेव्हापासून तो सात एकदिवसीय आणि १० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळला आहे. नुकत्याच पार पडलेल्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये १० सामन्यांमध्ये १९ विकेट घेऊन तो सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला. या शानदार खेळानंतरच त्याचा टीम इंडियात समावेश करण्यात आला आहे.



- **देशांतर्गत क्रिकेटमधील यशस्वी गोलंदाज**
जयदेव उनाडकट हा भारतीय देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात यशस्वी वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे. जयदेव उनाडकटने त्याच्या ९६ सामन्यांच्या कारकिर्दीत ३५३ विकेट्स घेतल्या आहेत, ज्यात रणजी ट्रॉफीच्या २०१९-२० हंगामातील रेकॉर्डब्रेक समावेश आहे, ज्यामध्ये त्याने ६७ विकेट घेतल्या आहेत. त्याच्या शानदार खेळामुळेच सौराष्ट्रचा संघ प्रथमच रणजी चॅम्पियन ठरला.

- **बांगलादेश कसोटीसाठी टीम इंडिया**
रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, शुबमन गिल, चेतेश्वर पुजारा, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टिरक्षक), रविचंद्रन अश्विन. रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, शार्दूल ठाकूर, जयदेव उनाडकट, मोहम्मद सिराज, उमेश यादव.

# बांधणच्या किशोर-किशोरी गट कबड्डी स्पर्धेत वेश्वीला दुहेरी मुकुट

**अलिबाग (वार्ताहर) :**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे राजू समजीसकर मित्र मंडळ बांधण यांनी बांधण येथे आयोजित केलेल्या रायगड जिल्हा किशोर, किशोरी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत दोन्ही गटात अलिबाग तालुक्यातील 'ओंकार वेश्वी' या संघाने दुहेरी मुकुट मिळवून अजिंक्यपद पटकावले. या स्पर्धेत किशोर गटात ६४ व किशोरी गटात १६ संघानी सहभाग घेतला होता.

मुलांच्या पहिल्या उपांत्य फेरीत ओमकार वेश्वी संघाने मरीआई धेरंड संघाचा निसटता पराभव करून अंतिम फेरीत खेळण्याचा मान मिळविला. तर दुसऱ्या उपांत्य फेरीत वेणगाव संघाने मळेकर संघाचा एकतर्फी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. मुलींच्या पहिल्या सेमी फायनलमध्ये बांधण संघाने दत्तात्रय स्पोर्ट्स पनवेल संघाचा पराभव केला, तर दुसऱ्या सेमी फायनलमध्ये ओंकार वेश्वी संघाने भिलेश्वर किहीम संघाचा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

मुलांचा अंतिम सामना ओंकार वेश्वी आणि वेणगाव या दोन संघात झाला. वेश्वी संघाने या लढतीत अंतिम विजेतेपद पटकाविले. या सामन्यात वेश्वीतर्फे प्रज्वल नलावडे, वरुण पाटील, प्रेम कांबळी (कर्णधार) यांनी अष्टपैलू खेळ केला, तर कौस्तुभ शेळके, नीरज हराळे, ओम शेळके, शुभम हराळे यांनी चांगली साथ दिली.



मुलींचा अंतिम सामना ओंकार वेश्वी व प्रतिस्पर्धी बांधण या दोन संघात खूप रंगतदार झाला. दोन्ही संघांनी पकडी व चढायांचा बहरदार खेळ करून गुणपत्रक हलता ठेवला होता. शेवटी हा सामना समान गुणांवर संपून ५ - ५ चढायांवर खेळविण्यात आला. शेवटच्या चढाईत कर्णधार वैष्णवी पाटीलने तीन खेळाडू बाद करून ते ३३x३० असा वेश्वी संघाने बांधण संघाचे आव्हान संपुष्टात आणून अजिंक्यपद पटकाविले. वेश्वी संघाकडून वैष्णवी पाटील, अनन्या निर्मळ, सानिका गोल यांनी सुरेख खेळ केला, तर सोनाली हर्णे, प्रचिती मुलूरकर, पायल धनगर, साभा खान यांनी चांगली साथ दिली. बांधण संघाकडून प्रिया गायकर, नेहाली पाटील छान खेळल्या.

मुलांच्या विजेत्या संघाचे पारितोषिक वितरण जि.प. माजी सभापती दिलीप भोईर यांच्या हस्ते, तर महिला संघाचे पारितोषिक वितरण गोल्डनमॅन संदेश पवार, सचिन तावडे, राजू समजीकर यांच्या हस्ते करण्यात आले. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जे. जे. पाटीलही यावेळी उपस्थित होते. संघाचे कोच प्रफुल्ल पाटील यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन केले.

# वर्धा शहर गुन्हे प्रगटीकरण पथकाची कार्यवाही

## वर्धा शहरातुन टाटा ए मालवाहु चोरनारा चोरटा नागपुर येथुन ताब्यात




**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**वर्धा :** सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, फिर्यादी नामे मोहसिन खान हफीज खान वय ३८ वर्ष रा. बुरड मोहल्ला आंबेडकर बगीच्या जवळ वधा यांनी सहा महिण्यापुर्वी एम.जे.मोटर्स सांवगी टी पॉईट वर्धा येथुन मोईन शेख याचेकडुन टाटा एस मालवाहू क्रिम रंगाची टाटा एस क्र. एम.एच. २७-एक्स - ४१६८ किंमत १७००००/- रू ची विकत घेतली होती. सदरची मालवाहु गाडी ते शहरात चालवित असत, दि. २९.११.२०२२ रोजी नेहमी प्रमाणे दिवसभर गाडी चालवुन रात्री ८.०० वा. गाडी आपले घरासमोर लॉक करुन उभी केली तसेच जेवन झाल्यावर रात्री ११.३० वा. दरम्यान घराबाहेर आले असता त्याचे मालकीची मालवाहु गाडी ही ठेवलेल्या ठिकाणी उभी दिसली. त्यानंतर दुस-या दिवशी दि. ३०.११.२०२२ रोजी सकाळी ७.०० वा. झोपेतुन उठुन घराबाहेर आले असता तेव्हा त्याचे मालकीची घरा समोर लॉक करुन ठेवलेली एक जुनी वापरती क्रिम रंगाची टाटा एस क्र. एम.एच. २७-एक्स-४१६८ किंमत अंदाजे ४०,०००/- रू.ची दिसुन न आल्याने फिर्यादीने आजुबाजुस तसेच गावात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादी यांनी दिनांक ३०.११.२०२२ रोजी त्याचे मालकीची टाटा एस गाडी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याबाबत त्यांनी पोलीस स्टेशन, वर्धा शहर येथे दिलेल्या रिपोर्ट वरून अप क्रमांक १५५७/२२ कलम ३७९ भांदवि अन्वये नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा तपासावर असताना मुखबिरकडुन माहीती मिळाली कि, सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली मालवाहु गाडी टाटा एस ही बाबा फरिद नगर, खरबी, जिल्हा नागपुर येथे असुन आरोपी सुध्दा तेथेच राहतो, अशा माहितीवरून बाबा फरिद नगर, खरबी. जिल्हा नागुपर येथे जावुन गुन्ह्यातील मालवाहु गाडीचा शोध घेतला असता आरोपी नोमान अहमद अखलाख अहमद वय २० वर्ष रा. बाबा फरीद नवाज नगर, नवीन बिहारी वस्ती, खराबी, नागपूर व गुन्ह्यातील मुद्देमाल बाबा फरिद नगर, खरबी, जिल्हा नागपुर येथे मिळुन आली. त्यावरुन सदर आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी गेलेली टाटा एस क्र. एम.एच.२७-एक्स-४१६८ किंमत अंदाजे ४०,०००/- रू., तसेच गुन्हा करण्याकरीता वापरण्यात आलेली हीरो स्प्लेंडर मोटर सायकल कींमत ३००००/- रू तसचे मोबाईल किंमत १००००/- रू असा एकुण जुमला किमत ७७०००/- रू चा. मुद्देमाल आरोपीचे ताब्यातुन जप्त करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नुरूल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी मा. आबुराव सोनवने साहेब यांचे मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक सत्यवीर बंडीवार यांचे निर्देशानुसार गुन्हे प्रगटीकरण पथकाचे किशोर पाटील, सचिन इंगोले, नापोशी राधाकिसन घुगे, नितेश भोयर, पोशी राहुल भोयर व योगेश ब्राम्हण यांनी केली.

# राळेगांव तालुका प्रमुख पदी मनोज भोयर यांची नियुक्ती




**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**राळेगांव :** राळेगांव तालुक्यातील बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे पदाधिकारी जाहीर करण्यात आले. संजय राठोड पालकमंत्री यांच्या तर्फे राळेगाव तालुक्याला लाभलेले समाज सेवक असलेले तालुक्यात नेहमी कार्यरत असलेले तालुका प्रमुख पदी मनोज भोयर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या निवडीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. समाज सेवक असलेले मनोज भोयर तालुक्याला लाभलेले एक कुशल नेतृत्व आहे. त्यांच्या निवडीने राळेगाव तालुक्यात बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची ताकत तालुक्यात वाढेल असे सर्वत्र दिसत आहे.

# अतुल वांदिले यांच्या वाढदिवसानिमित्त नि:शुल्क आरोग्य शिबिर, नेत्र तपासणी व बाळ रोग तपासणी शिबीर संपन्न

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**हिंगणघाट :** आजच्या युगात बदलत्या जीवन शैलीमुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे. ग्रामीण भागात हे जास्त प्रमाणात दिसून येत आहे. त्यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक असते. याच उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस तर्फे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले याच्या वाढदिवसानिमित्त शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यात आरोग्य शिबिरासह रक्तदान शिबीर, बाल आरोग्य शिबीर (लहान मुलांची तपासणी), नेत्र/डोळे तपासणी शिबिर, रक्त तपासणी शिबीर, एचआयव्ही तपासणी, सीबीसी तपासणी, मानसिक समुपदेशन, सिकलसेल तपासणी, बिपी, शुगर तपासणी, थायराईड तपासणी अशा अनेक शिबीराला १००० हून अधिक



रुग्णांनी या तपासणी शिबिरात सहभाग घेतला होता.

तसेच वाढदिवसाचे औचित्य साधून काही पदाधिकाऱ्याकडून शेकडो रुग्णांना भिंत घड्याळ (वॉच) वाटप करण्यात आले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन माल्यार्पण केले, दीप प्रज्वलित करत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या शिबिरात बाळरोग विशेषज्ञ डॉ अभिजित बोरकर, नेत्ररोग तज्ञ डॉ. कलोडे, डॉ. स्नेहल चौधरी एमएस, जीवन ज्योती ब्लड बँक चे डॉ प्रशांत सर, डॉ. सतीश नक्षीने तसेच उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट येथील संपूर्ण डॉक्टरची चमू इत्यादी डॉक्टरांनी रुग्णांची यशस्वीरित्या तपासणी केली. प्रस्तुत शिबीराच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संपूर्ण सेलच्या पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# नारायण लडी नारदीय कीर्तनाचे थोर प्रसारक-प्रा.नारायण निकम



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**वर्धा :** दि.९ डिसेंबर २०२२ रोज शुक्रवारला संपूर्ण महाराष्ट्रात नारदीय कीर्तनाला जनमानसात पोहचविणारे ह.भ.प.कीर्तनकार नारायणबुवा लडी हे नारदीय कीर्तनाचे थोर प्रसारक असल्याचे विचार संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा.नारायण निकम यांनी व्यक्त केले. ह.भ.प.नारायण लडी यांच्या स्मृतीत श्री.संत गजानन महाराज मंदिरात संपन्न झालेल्या श्रद्धांजली सभेत अध्यक्षीय विचार प्रकट केले. सुरुवातीला प्रसिद्ध गायक सागर संगीत व अजय हेडाऊ यांनी सुरेल भक्तीरचना सादर केल्यात. त्यांना तबला संगत श्याम सरोदे व शंकर तिखे यांनी केली.

याप्रसंगी प्रा.सचिन सावरकर, दिलीप मेने यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्यात. सभेचे संचालन वर्धा जिल्हा संगीत कलोपासक संघाचे सचिव किरण पटेवार यांनी केले. यावेळी समाजसेवक सुरेश पट्टेवार, धनंजय नाखले, संजय तिळले (पेंटर), प्रा.उत्तम पारेकर, बबन लडी, चिरडे, भिरंगी व नानाभाऊ पहाडे इत्यादी कलावंत आवर्जून उपस्थित होते.

# विरूळ येथील समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावर ई-लोकार्पण संपन्न

## विदर्भाचा सर्वांगीण विकासास महत्त्वपूर्ण भुमिका 'समृद्धी महामार्ग' पार पाडेल -आमदार दादाराव केचे



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**आर्वी :** आर्वी तालुक्यातील विरूळ येथील समृद्धी महामार्गाच्या टोलनाक्यावर ई- लोकार्पण भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न झाले. महाराष्ट्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्वाकांक्षी प्रकल्प असणाऱ्या 'समृद्धी महामार्गाचे' लोकार्पण झाल्याने नागपूर-मुंबई ७०१ कि. मी. चा प्रवास अवघ्या आठ तासावर आल्याने विकासाची गती सुद्धा वाढली आहे. पहिल्या टप्प्यात नागपूर-शिर्डी हा प्रवास जनतेसाठी खुला झाला आहे. या निमित्ताने आर्वी विधानसभा क्षेत्रातील विरूळ येथील टोलनाक्यावर संपन्न झालेल्या ई - लोकार्पण सोहळ्याला आमदार दादाराव केचे यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकार्पणा संबधीत आमदार (उर्वरित पान २ वर)

# लोकतंत्र सेनानी संघाच्यावतीने आमदार दादाराव केचे यांचा सत्कार



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**आर्वी :** आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार दादाराव केचे यांचा सत्कार लोकतंत्र सेनानी संघाचे सेनानी राजाभाऊ गिरधर यांनी सेनानींना मानधनाची रक्कम मिळण्यासाठी केलेल्या यशस्वी प्रयत्नांना यश मिळविण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरी पार पाडल्याबद्दल यथोचित सत्कार करून सन्मान केला. आणीबाणीच्या काळात लोकतंत्राला वाचवण्यासाठी काही लोकतंत्र सेनानींनी संघर्ष करत पुन्हा भारतात लोकतंत्र बहाल करण्यासाठी प्रयत्न केले. यातच अनेकांना तुरुंगात टाकले होते तर काही शहिद झाले होते. उठाव करणाऱ्या या सेनानींना मानधन मिळावे यासाठी प्रयत्न आमदार दादाराव केचे यांनी केले आहेत.

लोकतंत्र सेनानी संघाच्या वर्धा येथील सेनानींना त्यांच्या मानधनाची रक्कम मिळवण्याकरिता आमदार दादाराव केचे यांनी वेळो वेळी शासनस्तरावर पाठपुरावा केला होता. लोकतंत्र सेनानींच्यावतीने राजाभाऊ गिरधर यांनी आमदार दादाराव केचे यांचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगी सेनानी लखन गौड, गोपाल कचवे व कावा सामाजिक संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी व भारत विद्यालयाच्या स्थापनेला ७५ वर्ष पुर्ण

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**हिंगणघाट :** दिनांक १६ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२२ या दरम्यान भारत विद्यालय, हिंगणघाट येथे संस्थेव्दारे चालविल्या जाणाऱ्या ०९ शाळांच्या सहभागाने भव्य अमृत महोत्सवानिमित्य संयुक्त स्नेहसम्मेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. शुक्रवार १६ डिसेंबर २०२२ ला दुपारी ३.३० वाजता या स्नेहसम्मेलनाचे उद्घाटन अंजनगांव सुर्जी येथिल श्री देवनाथमठ चे श्रीनाथपीठाधिश्वर स्वामी जितेन्द्रनाथ महाराज यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, हिंगणघाटचे अध्यक्ष गोकुलदास राठी राहणार आहे. तथा प्रमुख अतिथी म्हणुन मा. आमदार समीर कुणावार, शिक्षणाधिकारी प्राथ. जि. प. वर्धा चे लिंबाजी सोनवणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा चे प्राचार्य मंगेश घोगरे आदी उपस्थित राहणार आहे.

दिनांक १७ व १८ डिसेंबर २०२२ ला सकाळी ८ ते ११ या वेळेत क्रिडा व विविध स्पर्धा तसेच दुपारी ३ ते सांयकाळी ६ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १९ डिसेंबर २०२२ ला समारोप व बक्षिस वितरण समारंभ सकाळी ८ वाजता प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, हिंगणघाटचे अध्यक्ष गोकुलदास राठी यांच्या अध्यक्षेखाली तथा शिक्षक आमदार नागोजी गाणार, विधान परिषद आमदार रामदास आंबटकर, शिक्षणाधिकारी जि.प. माध्य वर्धा चे सचिन जगताप, हिंगणघाट पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी अशोक कोडापे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तथा अभिलेखागार व सदभावना मंच विदर्भ चे श्रीकांत देशपांडे याच्या प्रमुख उपस्थित समारोप व बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, हिंगणघाट व भारत विद्यालय, हिंगणघाट यांच्या अमृत महोत्सवानिमित्य होणा-या संयुक्त स्नेहसम्मेलन कार्यक्रमास सर्व पालक व शहरातील सर्व नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी हिंगणघाटचे सचिव रमेश धारकर व भारत विद्यालय हिंगणघाटचे मुख्याध्यापक बळीराम रा.चव्हाण यानी केले.

# हिंगणघाट येथील पोलिस डि.बी.पथकाने केला चोरीचा गुन्हा उघड



**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**हिंगणघाट :** सदर वृत्त असे की, दिनांक ०५/१२/२०२२ चे रात्री २०.०० वा. सुमारास फिर्यादी हा झांशी राणी चौक, हिंगणघाट येथुन पायदळ फोनवर बोलत जात असताना दोन अज्ञात मोटरसायकल वरील इसम फिर्यादीचे मागुन येवुन त्याचे हातातील मोबाईल जबरीने हिसकावुन घेवुन गेल्याचे फिर्यादीचे पो स्टे ला दिलेल्या तोडी रिपोर्टवरून पोस्टे ला अपराध क्र. १२८० / २०२२ कलम ३९२, ३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून तपास सुरू होता.

सदर गुन्हा दाखल होताच पोस्टे हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रथक प्रमुख पोहवा. शेखर डोंगरे व त्यांच्या पथकासह हिंगणघाट शहर व लगतचे परिसरात सतत माहीती काढून आरोपी व मोबाईल बाबत शोध घेतला असता सदर गुन्हयातील जबरीने हिसकावुन नेलेला मोबाईल हा निशानपुरा वार्ड, हिंगणघाट येथे राहणारे गौरव श्रीधर वाघमारे व विधि संघर्षीत बालक दोन्ही रा. निशानपुरा वार्ड, हिंगणघाट यांनी हिसकावुन नेल्याची माहिती वरून त्यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी सदरची जबरी चोरी केल्याचे कबुली दिली असुन त्यांचे कडुन एक विवो कंपनीचा अॅन्ड्राईड मोबाईल व गुन्हा करण्या करीता वारलेली हिरो होंडा स्प्लेंडर मो. सा. क्र. एमएच-३४ / क्यु- ४३५८ असा आरोपी व वि.सं.बा. यांचे ताब्यातून जप्त करून आरोपी गौरव वाघमारे यास अटक केली.

सदर गुन्हयातील आरोपी गौरव वाघमारे याची पोलीस कोठडी घेतली असता. त्यास जबरी चोरी करीता वापरलेल्या वाहनाबाबत विचारपुस केली असता त्याने ते वाहन पो.स्टे, गिरड हद्दीतील कोरा गावातून चोरल्याची कबुली दिली तसेच त्याने त्याचे दोन विधी संघर्षीत बालकासह जिल्हयातील व बाहेर जिल्हयातील विविध प्रकारच्या ७ मोटसायकल व २ मोबाईल चोरल्याचे कबुली दिली. आरोपी गौरव वाघमारे याचेकडुन ७ मोटरसायकल, (उर्वरित पान २ वर)

# अल्लीपुर येथे रक्तदान रक्तदान शिबीर कार्यक्रम संपन्न

**साहसिक वृत्त / ११ डिसेंबर**

**अल्लीपूर :** अल्लीपुर येथे परीवर्तन युवा मंडळ नेहरू युवा केंद्र संलग्नीत अल्लीपुरच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला शीवसेनेचो गोपाल मेघरे, संदीप नरड, दीलीप घुसे व माजी पंचायत समीती सदस्य अशोक सुपारे, श्रीराम साखरकर, ग्रा. प. सदस्य सतीश काळे, सचीन पारसडे, कैलास बाळबुधे, तंटामूक्त अध्यक्ष धनराज सुपारे आदी पदाधिकारी मान्यवर उपस्थीत होते. उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते रक्तदान शिबीर कार्यक्रमाचे उत्घाटन करण्यात आले. या वेळेस गौरव लांजेवार, डॉ. मयुर कातोरे, सुखदेव डांगरी अवधुत फोटो ग्राफर व अनेकांनी रक्तदान केले.

गावातील अनेक तरुणांनी, ग्रामस्थ यांनी आयोजित रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले.

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)